मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/

# वृत्तमानस

Email : vrittamanas1@gmail. com
मुंबई/ पालघर | मुंबई, मंगळवार, ८ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १०८ | पाने- ८
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये

## यंदाचा विष्णुदास भावे पुरस्कार जेष्ठ अभिनेत्री सुहास जोशी यांना



**मुंबई :** मराठी रंगभूमीवरील मानाचा समजला जाणारा नाट्य क्षेत्रातील विष्णुदास भावे गौरवपदक 2024 श्रीमती सुहास उर्फ सुहासिनी जोशी यांना जाहीर झाला. श्रीमती सुहास जोशी यांचे मराठी चित्रपट, दूरदर्शन, नाट्य क्षेत्रातील ज्येष्ठ अभिनेत्री, नाट्य प्रशिक्षिका अशा अनेक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य आहे. यंदा दिले जाणारे हे 57वे भावे गौरव पदक आहे. गौरवपदक, रोख रक्कम 25 हजार स्मृतीचिन्ह, शाल व श्रीफळ असे गौरवपदकाचे स्वरूप आहे. 5 नोव्हेंबर रोजी रंगभूमीदिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार जब्बार पटेल यांच्या हस्ते वितरण होणार आहे.



महाराष्ट्राच्या गोविंदांनी स्पेनमध्ये फडकावला तिरंगा

पान 7

# माओवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात महाराष्ट्राला मोठे यश : मुख्यमंत्री

## नवी दिल्लीत डावी कडवी विचारसरणी प्रभावित क्षेत्राची सुरक्षा, विकासाबाबत आढावा बैठक

वृत्तसंस्था
नवी दिल्ली

राज्यात डाव्या विचारसरणीच्या नक्षलवादी कारवायांना तोंड देण्यासाठी तसेच नक्षलग्रस्त भागातील स्थानिक रहिवाशांचा विश्वास जिंकण्यासाठी आरोग्य, शिक्षण आणि रोजगाराच्या योजनांची यशस्वी अंमलबजावणी महाराष्ट्र शासनाने केली आहे. माओवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात महाराष्ट्राने मोठे यश मिळवले असून प्रथमच उत्तर गडचिरोली सशस्त्र माओवाद्यांपासून मुक्त झाले आहे. त्यामुळे या भागात भीती आणि दहशतीवर मात केल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज सांगितले.



नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली डावी कडवी विचारसरणी प्रभावित क्षेत्राच्या सुरक्षा व विकासाबाबत आढावा बैठक झाली. यावेळी नक्षलवादाला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने केलेल्या कारवाईची माहिती यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली. राज्यात २०१४ ते २०२४ या दहा वर्षांत माओवादविरोधी अभियान अधिक तीव्र झाले आहे. सशस्त्र माओवादी कॅडरची संख्या २०१३ मध्ये ५५० होती, ती २०२४ मध्ये अवघी ५६ झाली आहे. गेल्या सहा वर्षात ९६ सशस्त्र माओवादी मारले गेले, १६१ पकडले गेले आणि ७० जणांनी आत्मसमर्पण केले,असे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

### स्थानिकांचा विश्वास जिंकण्यात यश

*माओवाद्यांविरुद्धच्या कारवाईत केंद्र सरकार आणि शेजारील राज्य छत्तीसगड यांच्या धोरणांना महाराष्ट्र शासनाचा संपूर्ण पाठिंबा असेल, अशी ग्वाही देतानाच स्थानिकांचा विश्वास जिंकण्यासाठी आरोग्य, शिक्षण आणि रोजगार योजना राबवून डाव्या विचारसरणीच्या नक्षलवादी कारवायांचा सामना करून याभागातील भीती, दहशतीवर नियंत्रण ठेवण्यात यश मिळत असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.*

मुख्यमंत्री शिंदे यावेळी म्हणाले, माओवाद्यांची पुरवठा साखळी तोडण्यात महाराष्ट्राने आमच्या सरकारच्या कार्यकाळात मोठे यश मिळवले असून प्रथमच उत्तर गडचिरोली सशस्त्र माओवाद्यांपासून मुक्त झाले आहे. अबुझमाड ते एमएमसी झोनपर्यंतच्या माओवाद्यांच्या विस्तार योजनेलाही मोठा धक्का बसला आहे. या कार्यकाळात एकाही व्यक्तीची माओवादी संघटनांमध्ये नव्याने भरती झालेली नाही. सुरक्षा दलाचा सदस्यही शहीद झाला नाही. माओवाद्यांचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या अबुझमाडला लागून असलेल्या भामरागड परिसरातील एकूण १९ गावांनी माओवाद्यांना गावात येण्यास बंदी घातली आहे. हे आमच्या विकास धोरणाचे मोठे यश असल्याचेही त्यांनी सांगितले.

गर्देवाडासारख्या संवेदनशील भागात प्रथमच एसटी बस सेवा सुरू झाली. काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा निवडणुकीत गडचिरोली जिल्हा ७१.८८ मतदान टक्केवारीसह संपूर्ण महाराष्ट्रात अव्वल होता. माओवाद्यांनी मोठ्या प्रमाणावर बॅनर आणि पोस्टर्सद्वारे लोकांना मतदान न करण्याचे आवाहन केले होते. पण ते नाकारून लोकांनी बॅनर आणि पोस्टर्स फाडून ते जाळले आणि लोकशाहीवर आपला विश्वास व्यक्त केल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले.

## व्हिक्टर ॲम्ब्रोस आणि गॅरी रुवकुन यांना नोबेल पुरस्कार जाहीर

**स्टॉकहोम :** वैद्यकीय क्षेत्रातील नोबेल पारितोषिक २०२४ च्या पुरस्कारांची घोषणा आज (७ आक्टोंबर) करण्यात आली आहे. अमेरिकेचे व्हिक्टर ॲम्ब्रोस आणि गॅरी रुवकुन हे या नोबेल पारितोषिक २०२४ च्या पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत. मायक्रो आरएनएच्या शोधाबद्दल व्हिक्टर ॲम्ब्रोस आणि गॅरी रुवकुन यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे. शास्त्रज्ञ व्हिक्टर ॲम्ब्रोस आणि गॅरी रुवकुन यांना या वर्षीचे नोबेल पारितोषिक हे मायक्रोआरएनए या सूक्ष्म रेणूच्या शोधाबद्दल प्रदान करण्यात आले आहे.




# देवाभाऊ जो बोलता है वो करता है, और जो नही बोलता वो डेफिनेटली करता है।

## सोलापुरात फडणवीसांची फिल्मी स्टाईल

वृत्तसंस्था
सोलापूर

सोलापूर येथील पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघात भाजप आमदार समाधान अवताडे यांनी आयोजित केलेल्या मेळाव्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. यावेळी त्यांनी अगदी फिल्मी स्टाइलमध्ये डायलॉग मारला आहे. देवाभाऊ जो बोलता है वो करता है, और जो नही बोलता वो डेफिनेटली करता है, असा रावडी चित्रपटातील अक्षय कुमारचा डायलॉग त्यांनी म्हणला व उपस्थितांमधून टाळ्या आणि शिट्ट्या वाजल्या. देवेंद्र फडणवीस म्हणाले, या मतदारसंघातील पोटनिवडणुकांच्या प्रचारावेळी मी मंगळवेढा-पंढरपुरात



आलो होतो. त्यावेळी, मी सांगितले होते, तुम्ही मला 1 आमदार द्या, 106 आमदार होऊ द्या, मी सरकारचा कटेक्ट कार्यक्रम करतो. तुम्ही समाधान अवताडेंना आमदार केले, मी सरकार आणले, असे फडणवीस म्हणाले.

पुढे बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर तुम्हाला दुष्काळासाठी 24 गावांसाठी पाणी दिले. सातारा जिल्ह्यातला दुष्काळ संपवून दाखवला. सांगोला उपसा सिंचन योजनेतून संगोल्याच्या 50 हजार हेक्टर जमिनीला लाभ झालाय. आता मंगळवेढा येथील 17 हजार हेक्टर जमिनीचा फायदा होत आहे. अनेकजण मला विचारतात तुम्ही पाणी कोठून आणले, जिद्द असेल तर पाण्याचा थेंब थेंब वाचवून पाणी उपलब्ध केले जाते, असे फडणवीस म्हणाले.

राज्यात लाडकी बहीण, लेक लाडकी सारखी योजना, महिलांना एसटी बसमध्ये अर्ध्या तिकीटांमध्ये प्रवासाची सवलत दिली, यामुळे एसटीचा देखील फायदा झाला, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# हर्षवर्धन पाटलांच्या प्रवेशानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादीत बंडाचे वारे

प्रतिनिधी
पुणे

भाजप नेते आणि माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी आज शरद पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. या पक्षप्रवेश सोहळ्यातच राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यासह प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी अप्रत्यक्षरित्या विधानसभेसाठी इंदापुरातून हर्षवर्धन पाटील यांची उमेदवारीही जाहीर करून टाकली. पक्षाच्या या निर्णयानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे इंदापुरातील इतर नेते नाराज झाले असून या नाराज नेत्यांनी आज पत्रकार परिषद घेत बंडाचं निशाण फडकावलं आहे. प्रवीण माने, आप्पासाहेब जगदाळे




आणि भरतशेठ शाह यांनी एकत्रित पत्रकार परिषद घेत आम्ही ११ तारखेला कार्यकर्ता मेळावा आयोजित करत असल्याची घोषणा केली आहे.

लोकसभा निवडणुकीत आम्ही अत्यंत प्रामाणिकपणे सुप्रिया सुळे यांचं काम केलं. मात्र आता अचानक पक्षाने बाहेरून उमेदवार आयात केला आहे. यामुळे आमच्यावर मोठा अन्याय झाला असून तालुक्यातील जनतेतही मोठा उद्रेक होणार आहे. त्यामुळे आम्ही आता हा चेंडू जनतेचा न्यायालयात टाकणार असून ११ तारखेला मार्केट कमिटीच्या मैदानात कार्यकर्ता मेळावा घेणार आहोत. या माध्यमातून तालुक्यातील जनतेला तिसरा पर्याय देण्याचा आमचा प्रयत्न असणार आहे, अशी भूमिका यावेळी प्रवीण माने आणि आप्पासाहेब जगदाळे यांनी मांडली आहे.



*मुंबई : 153 दहिसर विधानसभा कार्यक्षेत्राद्वारे विभागात आनंदनगर येथे लोकांना ईव्हीएम मशीन जनजागृती मोहीम तहसीलदार अतुल सावे व नायब तहसीलदार बालाजी फोले यांच्या मार्गदर्शनाखाली झाले यावेळी सुभाष डुबे , सुभाष पाटील रमेश राठोड , भट सर पोलीस कॉन्स्टेबल, गुजरात चे ख़ासदार मितेश पटेल आणि स्थानिक माजी नगरसेवक जगदीश ओझा, माजी नगरसेवक जितेन्द्र पटेल मार्गदर्शन घेताना.*




## थोडक्यात

### वाघेरी ग्रामविकास मंडळाचे दसरा स्नेहसंमेलन

**मुंबई:** वाघेरी ग्रामविकास मंडळातर्पेâ दहावी, बारावी व पदवी विद्यार्थ्यांना गुणगौरव पुरस्कार वितरण व इतर क्षेत्रातील विद्यार्थ्यांचाही गुणगौरव शनिवार १२ ऑक्टोबर, २०२४ रोजी दसरा मेळाव्यात मंडळाचे अध्यक्ष प्रमोद धैर्यधर रावराणे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. हा मेळावा सह्याद्री विद्या मंदिर, श्री छत्रपती शिवाजी महाराज तलाव, भांडुप (प.), येथे सायंकाळी ४.३० वाजता होणार आहे, असे मंडळाचे चिटणीस संतोष मुरलीधर रावराणे यांनी कळविले आहे. या मेळाव्याला .सर्व ग्रामस्थांनी आवश्यक उपस्थित राहावे, असे आवाहन मंडळाचे प्रसिध्दी प्रमुख सुरेश ठुकरूल यांनी केले आहे. संपर्कासाठी : प्रमोद धैर्यधर रावराणे (मो ९८९२७९२१४५)

### जे. जे. रुग्णालयात अत्याधुनिक पध्दतीने हाताची शस्त्रक्रिया

**मुंबई:**जे.जे. रुग्णालयामध्ये अद्ययावत सोयी-सुविधा पुरवण्याबरोबरच अत्याधुनिक उपकरणे उपलब्ध करण्यावर भर दिल जात आहे. जे. जे. रुग्णालयामध्ये कार्यरत कर्मचारी घसरून पडल्याने त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली. त्यावर किचकट शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. जे.जे. रुग्णालयातील डॉक्टरांनी त्या कर्मचाऱ्यावर अत्याधुनिक पध्दतीने 'डिस्टल एंड ऑफ रेडीयस वॉलेट प्लेटींग' शस्त्रक्रिया करून कर्मचाऱ्याला दिलासा दिला. शस्त्रक्रियेनंतर काही दिवसांतच विनोद देरेकर यांना दिलासा मिळाला. खासगी रुग्णालयामध्ये 'डिस्टल एंड ऑफ रेडीयस वॉलेट प्लेटींग' शस्त्रक्रियेसाठी लाखो रुपये खर्च येतो. मात्र जे.जे. रुग्णालयामध्ये महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेमार्फत ही शस्त्रक्रिया मोफत करण्यात आली. त्यामुळे शस्त्रक्रियेचा कोणताही आर्थिक भुर्दंड विनोद देरेकर यांना बसला नाही.

# लोकनेते हितेंद्र ठाकूर राजकीय रिंगणात पुनरागमन करणार?

## कार्यकर्त्यांचा आग्रह आणि बदलती राजकीय समीकरणे

प्रतिनिधी
■ वसई

बहुजन विकास आघाडीचे अध्यक्ष लोकनेते हितेंद्र ठाकूर यांनी पाच वर्षांपूर्वी राजकारणातून निवृत्ती घेतली होती. मात्र सध्या बदललेली राजकीय परिस्थिती पाहता बहुजन विकास आघाडीला कठीण काळाचा सामना करावा लागत आहे. त्यांच्या कार्यकर्त्यांचा ठाम आग्रह आहे की, लोकनेते हितेंद्र ठाकूर यांनी पुनः राजकारणात प्रवेश करावा आणि वसई विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवावी.

बहुजन विकास आघाडीचे ज्येष्ठ नेते राजीव पाटील यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांनी आघाडीच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता निर्माण केली आहे. त्यातच लोकसभा निवडणुकीत बहुजन विकास आघाडीला झालेला पराभव कार्यकर्त्यांमध्ये नाराजी आणि चिंता वाढवणारा ठरला. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये आता ठाम



मत आहे की, हितेंद्र ठाकूर यांनीच पुढे येऊन नेतृत्व करावे. त्यांच्या नेतृत्वाखालीच वसई विधानसभा मतदारसंघामध्ये आघाडीला पुन्हा एकदा यश मिळू शकते, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

नुकताच आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने वसई आणि आसपासच्या परिसरात मोठ्या प्रमाणात बॅनर लावण्यात आले होते, ज्यावरून त्यांचे राजकीय पुनरागमन होण्याचे संकेत मिळत आहेत. भाजपने वसई व नालासोपारा मतदारसंघात आपली पकड मजबूत केली आहे, त्यामुळे बहुजन विकास आघाडीला सध्या मोठ्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे.लोकनेते हितेंद्र ठाकूर यांनी या परिस्थितीत काय भूमिका घेणार याकडे सगळयांचे लक्ष लागले आहे. कार्यकर्त्यांच्या इच्छेला मान देत ठाकूर मैदानात उतरतील का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे.

# चिंचोटी-भिवंडी रस्ता अपघातांचे केंद्रबिंदू

## वाहतुकीसाठी रस्ता ठरतोय कर्दनकाळ

प्रतिनिधी
■ वसई

वसई पूर्वेतील चिंचोटी-भिवंडी रस्ता सध्या अत्यंत धोकादायक ठरला असून, वाहतुकीसाठी हा रस्ता कर्दनकाळ ठरत आहे. मागील १० महिन्यांमध्ये या रस्त्यावरील अपघातांमध्ये ३ जणांचे प्राण गेले असून, ३ जण गंभीर जखमी झाले आहेत. रस्त्याच्या खडबडीत अवस्थेमुळे वाहनांचे मोठे नुकसान होत आहे, ज्यामुळे अनेक वाहने गॅरेजमध्ये मरम्मतीसाठी दाखल होत आहेत.

हा रस्ता अत्यंत नादुरुस्त अवस्थेत आहे. पावसाळयात या रस्त्यावरून प्रवास करणे म्हणजे जीव धोक्यात घालण्यासारखे आहे. खड्ड्यांमुळे वाहन चालकांना वाहने चालवणे कठीण झाले आहे. आजवर या रस्त्याच्या सुधारण्यासाठी अनेक आंदोलने आणि मागण्या झाल्या असल्या तरी, सार्वजनिक बांधकाम विभागाने केवळ आश्वासनांचीच पूर्तता केली आहे. प्रत्यक्षात कोणतीही सुधारणा न झाल्यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. भविष्यात या नाराजीचा तीव्र उद्रेक होण्याची शक्यता आहे.

रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे वाहनांचे सततचे नुकसान होत आहे. पंक्चर होणे, सस्पेन्शन खराब होणे, इंजिन आणि ब्रेक प्रणालीत बिघाड होणे हे नेहमीचे झाले आहे. या समस्यांमुळे वाहनचालकांना आर्थिक फटका बसत असून, वाहनांच्या दुरुस्तीवर मोठा खर्च करावा लागत आहे. दररोज मोठ्या संख्येने वाहने गॅरेजमध्ये दाखल होत आहेत, ज्यामुळे वाहन चालकांची तक्रार अधिक तीव्र होत चालली आहे. रस्त्याच्या समस्येबाबत प्रशासनाने तातडीने पावले उचलावी आणि रस्ता दुरुस्तीसाठी कार्यवाही करावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. तसेच, आणखी अपघात आणि जीवित हानी टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना आवश्यक आहे.

# जि.प.शाळा मोरखडक येथे वनविभागाकडून वन्यजीव सप्ताह



प्रतिनिधी
■ मोखाडा

संपूर्ण राज्यात १ते ७ ऑक्टोंबर या कालावधीत वन्यजीवन सप्ताह साजरा करण्यात येतो.याच सप्ताहानिमित्त वनपरिक्षेत्र मोखाडा कार्यालय अंतर्गत जि.प.शाळा मोरखडक येथे "वन्य प्राण्यांचे संवर्धन हेच पर्यावरणाचे संरक्षण" या नाऱ्या प्रमाणे वनपरिक्षेत्राच्या वतीने १ ते ७ ऑक्टोंबर वन्य जीवन व पर्यावरण जागृतीसाठी जि.प.शाळा मोरखडक येथे ७ऑक्टोबर रोजी वन व वन्य जीवांचे चे संरक्षण करणे,शिकारीवर आळा घालने,पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे,वृक्षतोडीला आळा घालने या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आले.

यावेळी वनपाल बी.एन. बांडे,वनपाल एस.डी. जगताप,वनरक्षक व्ही. एस.मागाडे,वनरक्षक डी.आर. व्होनमाने, वनरक्षक वाय. एन.ठोंबरे, वनरक्षक योगिता नवले,मुख्याध्यापक बिन्नर सर, देसले सर,कलदुर्के सर, पाटील सर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व्होनमाने वनरक्षक यांनी केले तर आभार शाळेचे शिक्षक कलदुर्के सर यांनी मानले.जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी आणि विद्यार्थिनी वन विभागाचे कर्मचारी व शिक्षक वन्य जीव सप्ताह जनजागृती कार्यक्रमात सहभागी झाले तसेच वन्य जीवन पर्यावरणाच्या संवर्धनात सर्वांनी हातभार लावून वनविभागाला सहकार्य करावे असे आवाहन वनपाल बांडे यांनी केले.

# वसईत नवरात्री महायज्ञात भक्तांची उत्स्फूर्त उपस्थिती

## दररोज महाप्रसादाचे आयोजन

■ वसई

वसई पश्चिमेतील स्वस्तिक सेवा संस्थेच्या आयोजनात भवानी माता राणीच्या प्रतिमेचे भव्य दर्शन व सजावट पहायला भक्तांची मोठी गर्दी उसळली आहे. या नव दिवसीय महायज्ञात दररोज 3 ते 5 हजार भाविक महाप्रसादाचा लाभ घेत असून, धार्मिक वातावरणात महाभंडाऱ्याचे आयोजन होत आहे. वृंदावन धामातून आलेले यज्ञाचार्य श्री राधाकृष्णनजी महाराज यांचे मार्गदर्शनाखाली विशेष हवन आणि



पूजन विधी पार पडत आहेत.

स्वस्तिक सेवा संस्था मागील सात वर्षांपासून नवरात्रीच्या निमित्ताने नव दिवसीय महायज्ञाचे आयोजन करत आहे. या महायज्ञात गणेश-लक्ष्मी पूजन, सुहागिनी पूजन, महालक्ष्मी शस्त्र अर्चन, सुंदरकांड पाठ, आणि भजन-कीर्तन असे विविध धार्मिक कार्यक्रम भक्तांसाठी ठेवले जातात. यज्ञाचाऱ्यांनी या महायज्ञाचे महत्व सांगताना स्पष्ट केले की, हे धार्मिक आयोजन समाजाच्या कल्याणासाठी असून, यज्ञाच्या माध्यमातून दैवी आणि भौतिक संकटांचे निवारण होते.

# बांधकामांचा गोंगाट विद्यार्थ्यांसाठी डोकेदुखी; वेळ मर्यादा ठरवण्याची नागरिकांची मागणी

प्रतिनिधी
■ वसई

सध्या वसई-विरार शहरात विविध ठिकाणी बांधकाम कामे जोरात सुरू असून, या कामांच्या गोंगाटामुळे शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. सहामाही परीक्षा तोंडावर असताना, विद्यार्थ्यांना सकाळपासूनच सुरू होणाऱ्या आणि रात्रीपर्यंत चालणाऱ्या या बांधकामांमुळे अभ्यासात अडथळे येत आहेत. यामुळे पालक आणि नागरिकांनी बांधकामांच्या वेळांवर मर्यादा लावण्याची मागणी केली आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांचा अभ्यासावर परिणाम होणार नाही.

शहरात सकाळी ६ वाजताच बांधकाम सुरू होते आणि रात्री अपरात्रीपर्यंत चालू असते. या दरम्यान, मजुरांच्या आवाजाचा गोंगाट, उपकरणांच्या आवाजाची |तीव्रता आणि स्लॅब भरण्यासारखी कामे चालू राहतात. त्यामुळे विद्यार्थी अभ्यासावर लक्ष केंद्रित करू शकत नाहीत, परिणामी त्यांची एकाग्रता भंग होते. दिवाळीपूर्वी होणाऱ्या सहामाही परीक्षांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची तयारी खंडित होत आहे.

विद्यार्थ्यांचे पालक आणि स्थानिक नागरिकांनी पालिकेकडे मागणी केली आहे की, बांधकामांच्या वेळा ठरवाव्यात, विशेषत: सकाळी आणि रात्रीच्या वेळात कामे बंद ठेवावीत. यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी शांत वातावरण मिळेल आणि त्यांचा अभ्यासात अडथळा येणार नाही.

महानगरपालिकेने बांधकामांच्या वेळा निश्चित करण्यासाठी काही उपाययोजना केल्या नाहीत, तर नागरिकांनी यासंदर्भात आवाज उठवण्याची तयारी दर्शवली आहे. पालकांचे म्हणणे आहे की, शहराच्या विकासाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करणे गरजेचे आहे. अशा प्रकारच्या समस्यांवर उपाय म्हणून नागरिकांनी आणि पालकांनी एकत्र येऊन पालिकेकडे तक्रार दाखल करण्याची तयारी दर्शवली आहे.

# खाजगी रुग्णालये माहितीच्या अधिकारात घ्या; गणेश वराडेंची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

खाजगी रुग्णालयांमध्ये स्वतःचा मनमानी कारभार करुन रुग्णांची पिळवणूक केली जात आहे. या खाजगी रुग्णालयांना जाब विचारण्याला गेल्यास उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. त्यामुळे खाजगी रुग्णालयात नाईलाजाने उपचार घेणाऱ्या सर्वसामान्य रुग्णांची आणि त्यांच्या नातेवाईकांची चांगलीच ओढाताण होताना दिसत आहे. या खाजगी रुग्णालयावर अंकूश लावण्यासाठी त्यांना माहितीच्या अधिकाराखाली घेतल्यास सर्वसामान्याची आर्थिक लूट आणि पिळवणूक थांबेल अशी मागणी वजा विनंती सामाजिक कार्यकर्ते गणेश



नारायण वराडे यांनी मुख्यमंत्र्यांकडे पत्राद्वारे केली आहे. राज्याच्या मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रामध्ये गणेश वराडे यांनी असेही म्हटलेकी रुग्णालये मनमानी करत भरमसाठ शुल्क आकारुन रुग्णांना वेठीस धरले जात आहे. त्यामुळे नाईलाजाने खाजगी रुग्णालयात उपचार घेण्यासाठी येणाऱ्या रुग्णांना आणि त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. हा सर्व मनमानी प्रकार थांबवण्याकरीत खाजगी रुग्णालयांना माहिती अधिकार अधिनियम कक्षात आणल्यास स्वतःचा मनमानी कारभार करीत असलेल्या खाजगी रुग्णालयांना एक प्रकारे अंकूश बसेल असे मत वराडे यांनी व्यक्त केले.



*मुंबई : पीपल्स रिपब्लिकन पार्टी युवक आघाडीच्या मुंबई अध्यक्षपदी भास्कर बोदडे यांची नियुक्ती पीपल्स रिपब्लिकन पार्टी च्या प्रदेश कार्यालय भीमालय येथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. जोगेंद्र कवाड़े व राष्ट्रीय कार्याध्यक्ष जयदीप कवाड़े यांनी केली. नियुक्ती नंतर भास्कर बोदडे यांनी त्यांचे आभार मानले. व मिळालेल्या संधीचे सोने करू.असे सांगितले.*


**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.


## PUBLIC NOTICE

**HOUSING DEVELOPMENT FINANCE CORPORATION LIMITED**
**Regd Office :** Ramon House, HT Parekh Marg, 169, Backbay Reclamstion, Churchgate, Mumbai-400 020

NOTICE is Hereby given that the certificate for the undermentioned securities of the company has been lost/misplaced and the holder of the said securities/applicant has applied to the Company to Issue duplicate certificate. Any person who has a claim in respect of the said securities should lodge Such claim with the company at its registered office or Datamatics Business Solution Ltd. Plot no B-5, Part B, Cross lane, MIDC, Andheri East, Mumbai - 400093. within **15 days** from this date, else the Company Will proceed to issue duplicate certificate without further intimation.

| Name Of Holder | No of Securities & Face Value | Folio No | Certificate No | Distinctive Numbers |
|---|---|---|---|---|
| Puriben Noorjibhai Modi | 500 of Rs. 2 | 00210035 | 10766 | 14465836 - 14466335 |

Place : Mumbai
Date : 08/10/2024

Puriben Noorjibhai Modi (Applicant)

## डहाणू नगर परिषद

ता. डहाणू, जि. पालघर
वार्षिक फेर ई-निविदा सूचना
पाणी पुरवठा विभाग

जा.क्र. डनप/२२५३/२०२४-२५ दि. ७/१०/२०२४

मुख्याधिकारी डहाणू नगरपरिषद हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत प्रवर्गातील ठेकेदारांकडून खालील कामाकरिता वार्षिक फेर ई-निविदा मागवित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव |
|---|---|
| 1 | पाणी पुरवठा विभागातील दैनंदिन कामकाज करिता हार्डवेअर साहित्य पुरवठा करणे. |
| 2 | पाणी शुध्दीकरणासाठी तुरटी, ब्लिचिंग पावडर पुरविणे व क्लोरिन वायु सिलेंडर व इतर साहित्य पुरविणे, |
| 3 | डहाणू नगरपरिषदेच्या मालकीचे सरावली जलशुध्दीकरण केंद्र येथील 100 HP, 20 HP मोटार पंप, साखरे धरण येथे 30 HP मोटार पंप व इतर साहित्य स्टार्टर डेल्थ, स्टार्टर व मल्याण स्मशानभुमी आणि कम्युनिटी हॉल येथील 2HP, 1HP मोटार इतर विद्युत साहित्व दुरुस्ती करणे व पुरवठा करणे. |

| अ.क्र. | तपशिल | निविदा प्रसिध्दी दिनांक | वेळ | निविदा समाप्त दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|---|
| 1 | निविदा प्रसिद्धी | 08/10/2024 | सकाळी 11:00 | -- | -- |
| 2 | कागदपत्र डाऊनलोड करणे | 08/10/2024 | सकाळी 11:00 | 15/10/2024 | सायं 5:00 |
| 3 | निविदा ऑनलाईन भरणेचा कालावधी | 08/10/2024 | सकाळी 11:00 | 15/10/2024 | सायं. 5:00 |
| 4 | ऑनलाईन निविदा उघडणेचा कालावधी | 17/10/2024 | सकाळी 11.00 वा. किंवा प्रशासकिय सोयीनुसार | | |

**अटी व शर्ती :-**

1. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया फेर ई-निविदाव्दारे ऑनलाईन पध्दतीने संगणक प्रणालीवर होईल. सदर निविदा सुचना प्रसिध्दी आवश्यक असणारी कागदपत्रे शुध्दीपत्र इत्यादी माहीती https://www.mahatenders.gov.in संकेस्थळावर उपलब्ध होईल.
3. ई-निविदा प्रक्रिया तपशिल वरील संकेतस्थळावर (वेबसाईटवर) दिनांक: 08/10/2024 पासून उपलब्ध होईल.
3. कारण नमुद करून अथवा असे कारण न देता आलेल्या फेर ई - निविदा स्विकारणे अथवा फेटाळणेचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

सही-
(वैभव आवारे)
मुख्याधिकारी डहाणू नगर परिषद

## वसई-विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'सी'**

मुख्य कार्यालय, विरार (पुर्व), ता. वसई, जि. पालघर, पिन ४०१ ३०५. दुरध्वनी 2525105/06/2525888/2523890 फॅक्स : 0250-2525107 ईमेल - vasaivirarcorporation@yahoo.com

जा.क्र. वविशम/प्रससी/जाही / १५२/२०२४-२५ दि. ०७/१०/२०२४

वसई विरार शहर महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अधिसुचीतल प्रकरण ८ मधील कलम १(१) व १(२) अन्वये व ४६९ च्या नुसार जाहिर नोटीस खालिल मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधित वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय विरार येथे प्राप्त मालमत्ता प्रकरणपरत्य नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई विरार शहर महानगरपालिका विभागीय कार्यालय लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी. अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी अनुसुचित दोन/तीन करनिर्धार पुस्तकाती हस्तांतरण करून महानगरपालिका याबाबत नोंद घेतली जाईल.

| अ. क्र. | दिनांक | करनिर्धार पुस्तकातील वॉर्ड क्र. | मालमत्तेचे ठिकाण | मालमत्तेचे स्वरुप | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्याचे नाव किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीखताचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २४/०९/२०२४ | VR०१/१५४/१/४ | ०१ | गुलसुम मझोल नारंगी, विर सावरकर मार्ग | निवासी | गुलसुम मंझील नारंगी, विर सावरकर मार्ग | सुषमा राजनाथ यादव |
| २ | २४/०९/२०२४ | VR३४/२२/११ | ३४ | देवछाया अपार्ट. नं. २, रुम नं.८ | निवासी | शशिकांत बळवंत विरकर | सुखदा श्रीकांत मांदुस्कर व हिमानी प्रथमेश पुरोहित |
| ३ | २४/०९/२०२४ | VR३१/९२/११ | ३१ | ओम आर्केट, शॉप नं. ११ | निवासी | नरेंद्र ही परमार | महेश किसन करपे |
| ४ | २४/०९/२०२४ | VR०१/६०४/६ | ०१ | साईलिला अपार्टमेंट, रुम नं. ६ कोकण निवास चाळ | निवासी | शांताराम बाबजी गावडे | श्रीकांत श्रीधर कदम व प्रवीण श्रीधर कदम |
| ५ | २४/०९/२०२४ | VR०२/९०३/४६ | ०२ | नवदुर्गा अपार्टमेंट रुम नं. २१० | निवासी | बल्लारेश्वर डेव्हलपर्स | संदेश विश्राम जाधव व योगिता संदेश जाधव |
| ६ | २४/०९/२०२४ | VR०५/१५९४/७३ | ०५ | ओम अपार्ट, रुम नं. ए/२०१ सहकार नगर, बटुर माळी कंपाऊंड जवळ | निवासी | गजानन रामराव भांबळे | शैल विद्यानंन्द चौधरी |
| ७ | २४/०९/२०२४ | VR०५/१२४५/९७ | ०५ | जय जिवदानी दर्शन चाळ, रुम नं. डी/ए, शांता चंद्रकांत जाधव कंपाऊंड, | निवासी | अनिता अमोल झा | रामानन्द सुरेश झा |
| ८ | २४/०९/२०२४ | VR०५/१७०६/५६ | ०५ | माता प्रसाद अपार्टमेंट रुम नं. बी ३०९ जाधव कंपाऊंड सहकार | निवासी | गीराजा देवी | रामजीत घुरेलाल विश्वकर्मा |
| ९ | २४/०९/२०२४ | VR०५/१५२२/३१ | ०५ | नामदेव अपार्ट, रुम नं. २१० गांधी चौक, फुलपाडा रोड | निवासी | लिना विक्रम को | महेंद्र विठ्ठल धावडे |
| १० | २४/०९/२०२४ | VR०५/१७४७/३२ | ०५ | अनुराग अपार्टमेंट, रुम नं. ३०२ मथुरा डेरी जवळ, सहकार नगर | निवासी | धनश्री इंटरप्रायजेस | भगवान दाई देवी |
| ११ | २४/०९/२०२४ | VR०१/५१८/५० | ०१ | ओमकार अपार्ट, आकार नगरच्या बाजुला | निवासी | अरुणा संजय साहू | योगेश परशुराम जाधव व कल्पना योगेश जाधव |
| १२ | २४/०९/२०२४ | VR०५/११४९/९१ | ०५ | श्रीकृष्ण अपार्टमेंट, रुम नं. बी/०२ फुलपाडा डंमजवळ | निवासी | राधाबाई श्रीकृष्ण चिंदरकर | संदिप भरत चौरसिया |
| १३ | २४/०९/२०२४ | VR०५/१४०१/२ | ०५ | यशोधन अपार्टमेंट रुम नं. ००२. नारायण नगर गांधी चौक, फुलपाडा | निवासी | विलास रतनसिंह चव्हाण | अर्चना अनिल पवार |
| १४ | २४/०९/२०२४ | VR२१/५५/११ | २१ | साई कमल, पहिला माळा रुम नं. १०२ | निवासी | सरोजिनी धर्मद परदेशी | दिपक सदाशिव पवार व दिपिका दिपक पवार |
| १५ | २४/०९/२०२४ | VR०५/१५५०/५६ | ०५ | मंगलमुर्ती अपार्टमेंट बिल्डींग नं-३, रुम नं.४०८ गांधी चौक, फुलपाडा | निवासी | योगीराज कोरगांवकर | मिनाक्षी ऋषिकेश डांबरे |
| १६ | २६/०९/२०२४ | VR०५/१५९४/१३३ | ०५ | ओम अपार्टमेंट, ईविंग, रुम नं. २०३, सहकार गनर, विरार पूर्व | निवासी | ओम डेव्हलपर्स | शिवाजी गणपत सपकाळ |
| १७ | २६/०९/२०२४ | VR०२ / ८२६/२२ | ०२ | पंचवटी अपार्टमेंट रुम नं. २०७ | निवासी | काशिराम बाळू कांबळे | सुदर्शन शांताराम शिर्के |
| १८ | २६/०९/२०२४ | VR०२ / ८२६/१५ | ०२ | पंचवटी अपार्टमेंट रुम नं. ३०४ | निवासी | जितेंद्र बापू कांबळे | नम्रता जितेंद्र कांबळे |
| १९ | २६/०९/२०२४ | VR०२/८२६/१४ | ०२ | पंचवटी अपार्ट, रुम नं. ३०३, पाचपायरी रस्ता | निवासी | लीला बापू कांबळे | नम्रता जितेंद्र कांबळे |
| २० | २६/०९/२०२४ | VR०२/६१/३५ | ०२ | पांडुरंग निवास, रुम नं. ३०८, गणपती मंदिर, येसुबाई निवास मागे | निवासी | विनायक सिताराम येलवणकर | दिप्ती केतन पारेख |

संदर्भ :- मा. उप-आयुक्त यांच्याकडील पत्र जावक क्र.व.वि.श.म./आक जा.क्र ६७०/२०२१ दि. २३/१२/२०२१.

सही/-
व्हिक्टर डिसोजा
सहा. आयुक्त
प्रभाग समिती "सी" चंदनसार
वसई विरार शहर महानगरपालिका

Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 108**
**R.N.I. Registration No. - 65609/96**

मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबावदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १०८**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**

*मुंबई : शिवसेना (उध्दव ठाकरे) जोगेश्वरी विधानसभा संघटक /माजी नगरसेवक अनंत (बाळा ) भि. नर यांच्या माध्यमातून, शाखाप्रमुख मंदार मोरे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये प्रभाग क्र. ७४ मधील दत्त टेकडी, शिवटेकडी विभागातील १०० रहिवाशांना Food For Hungry या वाक्याप्रमाणे धान्य वाटप करण्यात आले. याप्रसंगी शाखाप्रमुख . मंदार मोरे,संस्थेचे पदाधिकारी आणि सुनिल इल्ले,उपशाखाप्रमुख रुपेश शेलार, जेष्ठ शिवसैनिक पेडणेकर, आयरे उपस्थित होते. प्रतिमाह हा धान्य वाटप उपक्रम गेल्या दीड वर्षांपासून माजी नगरसेवक अनंत (बाळा) नर यांच्या माध्यमातुन सुरू आहे.*



# चेंबूरच्या आगीत माणुसकीही खाक, चोरट्यांनी 14 लाखांचा ऐवज चोरला

प्रतिनिधी
■ मुंबई

चेंबूरमधील सिद्धार्थ कॉलनी परिसरात रविवारी पहाटे एका घराला लागलेल्या भीषण आगीत मृत्युमुखी पडलेल्या एकाच कुटुंबातील सात जणांच्या पार्थिवावर रात्री पोस्टल कॉलनी परिसरातील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. गेल्या ५० ते ६० वर्षांपासून गुप्ता कुटुंबीय सिद्धार्थ कॉलनी परिसरात वास्तव्यास होते. त्यामुळे या घटनेनंतर संपूर्ण सिद्धार्थ कॉलनीवर दुःखाची अवकळा पसरली. दरम्यान, आगीत मृत्युमुखी पडलेल्या सात जणांच्या पार्थिवावर रविवारी रात्री ८ च्या पोस्टल कॉलनी स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.खेदाची बाब म्हणजे गुप्ता कुटुंबियांच्या दुर्घटनाग्रस्त घरात शिरून चोरट्यांनी सुमारे १४ लाखांचा ऐवज लुटून नेल्याचे उघड झाले आहे.



दरम्यान सिध्दार्थ कॉलनी परिसरातील छेदीराम गुप्ता यांच्या घराला लागलेली आग विझविल्यानंतर काही अज्ञात व्यक्ती तेथे फिरत होत्या. त्यांनी दुर्घटनाग्रस्त घरात प्रवेश केला आणि घरातील कपाट तोडून त्यातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम असा १२ ते १४ लाख रुपयांचा ऐवज लुटून नेला. याप्रकरणी छेदीराम यांच्या मुलीने चेंबूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून याप्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

आगीच्या घटनेनंतर मृतांना तत्काळ राजावाडी रुग्णालयात हलविण्यात आले होते. यावेळी त्यांच्या मृत्यूचा दाखला तयार करण्यासाठी आधारकार्डची गरज होती. यावेळी छेदीराम याची मुलगी वंदना गुप्ता हिने तिच्या मुलीला दुर्घटनाग्रस्त घरातील कपाटामधील आधारकार्ड घेण्यासाठी पाठवले होते. यावेळी घरातील कपाटातील तिजोरी तोडल्याचे तिच्या लक्षात आले. तिने तत्काळ ही बाब वंदना यांना सांगितली. त्यामुळे त्याही घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी पाहणी करून सोमवारी चेंबूर पोलीस ठाण्यात याप्रकरणी तक्रार दाखल केली. तक्रारीत घरातील कपाटात साडेचार लाख रुपये रोख आणि कुटुंबातील महिलांचे दहा ते बारा तोळे सोन्याच्या दागिन्यांची चोरी झाल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. याप्रकरणी चेंबूर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## मुख्यमंत्र्यांकडून दुर्घटना स्थळाची पाहणी; उच्चस्तरीय चौकशीचे आदेश

चेंबूर येथील सिद्धार्थनगर मधील आगीच्या दुर्घटनेतील मृतांच्या नातेवाईकांना पाच लाख रुपयांची मदत दिली जाईल. तसेच जखमींवर शासनाच्या खर्चाने उपचार केले जातील, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.मुख्यमंत्री . शिंदे यांनी या दुर्घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. यात त्यांनी दुर्दैवी कुटुंबियांची आस्थेने विचारपूस केली. तसेच त्यांना सर्वतोपरी आधार देण्याचा दिलासा दिला. दूर्घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. ते म्हणाले की, ही अतिशय दुर्दैवी घटना आहे. गुप्ता कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलाय. या दुर्घटनेची उच्चस्तरीय चौकशी होईल. अशा दुर्घटना पुन्हा होऊ नयेत यासाठी काळजी घेता यावी यासाठी उपाययोजनांचाही आढावा घेतला जाईल. याठिकाणी झोपडपट्टी पुनर्वसनाचे काम रखडले असेल,तर त्याबाबतही बैठक घेऊन योग्य ते निर्णय घेतले जातील, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

# राज्यात काँग्रेस सत्तेत आल्यानंतर वाढवण बंदर रद्द होणार - नाना पटोले

प्रतिनिधी
■ मुंबई

## मच्छिमार नेत्यांच्या बैठकीत आश्वासन



रविवारी काँग्रेस पक्षाच्या टिळक भवन येथील प्रदेश कार्यालयात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले ह्यांच्या अध्यक्षतेखाली कॉंगेस मच्छिमार सेल मधील पदाधिकारी आणि मच्छिमार नेत्यांबरोबर पार पडलेल्या बैठकीत, मच्छिमार समाजावर सत्ताधाऱ्यांकडून वेग वेगळ्या पद्धतीने होऊ घातलेल्या अन्यानावर सखोल चर्चा करण्यात आली. ज्यामध्ये गोड्या पाण्यातील मच्छीमारांचे सौर ऊर्जा प्रकल्पामुळे होणारे नुकसान, अवैध मासेमारी, कोळीवाडे मच्छिमारांच्या नावे करणे, एल.ई.डी मासेमारी, डिझेल परतावा, प्रशासनाकडून मच्छिमारांना मिळणारी दुय्यम वागणूक ह्या विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच वाढवण बंदर उभारणीमुळे मच्छिमार समाज देशोधडीला लागणार असून ह्या विनाशकारी प्रकल्पाच्या विरोधात मच्छिमार समाजाबरोबर काँग्रेस पक्ष उभा आहे आणि विधान सभा निवडणुकीनंतर राज्यात काँग्रेसची सत्ता आल्यानंतर हा प्रकल्प रद्द करण्याचे ठोस आश्वासन पटोले ह्यांनी उपस्थित मच्छिमारांना दिले.

वाढवण बंदर हा जरी केंद्राचा प्रकल्प असला तरी बंदर उभारणीसाठी केंद्र आणि राज्य शासनाचा करार झाला असून केंद्राची ७४ टक्के (JNPA) तर महाराष्ट्र राज्याची २६ टक्के (MMB) भागीदारी वाढवण पोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (VPPL) ह्या कंपनीत आहे. जर राज्य सरकार मच्छिमारांच्या हिताचे रक्षण करणार नसेल तर त्यांनी झालेला करार रद्द करावा म्हणजे बंदर उभारणी प्रक्रियेला खंड पडेल. त्यामुळे मच्छिमार समाजाला दिलासा मिळेल. काँग्रेस पक्षाकडून मिळालेले ठोस आश्वासन मच्छिमारांना एक नवीन ऊर्जा आणि संजीवनी प्रदान करण्यासारखी असल्याचे मत अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र दामोदर तांडेल यांनी व्यक्त केले.

सत्तांतराशिवाय आता मच्छिमार समाजासमोर गत्यंतर नसल्यामुळे आणि वाढवण बंदर सत्तांतराने जर रद्द होणार असेल तर आगामी विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला भरघोस मतदान करण्याचे आवाहन मच्छिमार संघटनेकडून होणार असल्याचे समितीचे युवा अध्यक्ष मिल्टन सो सौदिया यांनी सांगितले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले ह्यांच्या बरोबर रविवारी झालेल्या बैठकीत अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र दामोदर तांडेल, युवा अध्यक्ष मिल्टन सौदिया, महाराष्ट्र काँग्रेस मच्छिमार सेलचे अध्यक्ष मार्तंड नाखवा, ऑल इंडिया फिषरमेंनस काँग्रेस सेलचे रामदास संधे, कचरोजी भारसकर, नंदकुमार नगरे, मार्शल कोळी आदी उपस्थित होते.

# पालिकेने आशा वर्कर्सना दिवाळीसाठी बोनस देण्याची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील आशा वर्कर्सचे अनेक प्रश्न प्रलंबित असल्यामुळे मुंबई जिल्हा आशा व गटप्रवर्तक युनियन च्या वतीने आज ८ ऑक्टोबर रोजी दुपारी २ ते ५ या वेळेत आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

मागील वर्षी मुंबई परिसरातील अनेक महानगरपालिकांनी त्यांच्या अंतर्गत काम करणाऱ्या आशांना दिवाळी बोनस/ सानुग्रह अनुदान दिले होते. उदाहरणार्थ, नवी मुंबई – १४,००० रु. ठाणे - ६००० रु. मीरा भाईंदर - ५००० रु. इत्यादी. अनेक वर्षांपासून बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे आशांना दिवाळी बोनस/ सानुग्रह अनुदान मिळावे अशी मागणी करण्यात येत आहे . बृहन्मुंबई महानगरपालिकेचे उत्पन्न इतर महानगरपालिकांपेक्षा अनेक पटींनी जास्त असूनही त्यांनी आजपर्यंत दिवाळी बोनस/ सानुग्रह अनुदान न दिल्यामुळे आधीच अल्प मानधनावर काम करणाऱ्या आशांची दिवाळी अंधारात गेली आहे. समान काम करणाऱ्या आरोग्य सेविकांना बीएमसी दिवाळी बोनस/ सानुग्रह अनुदान दर वर्षी देत आहे. या वर्षी एनएचएम व बीएमसी आशांनाही तितकीच रक्कम दिवाळी बोनस/ सानुग्रह अनुदान देण्यात यावा, मुंबई महानगरात झोपडपट्टीवासियांची लोकसंख्या सुमारे ६५ लाख आहे व त्यांना आरोग्य सेवा देणे गरजेचे आहे. बीएमसी अंतर्गत काम करणाऱ्या आरोग्य सेविकांची पदे कित्येक वर्षे न भरल्याने त्या जागा रिक्त आहेत. त्या जागी आशांनी काम करावे हे बीएमसीला अपेक्षित आहे. १२०० लोकसंख्येला १ याप्रमाणे आशा भराव्यात असे एनएचएमचे दिशानिर्देश आहेत. याप्रमाणे आशा घेतल्या तर सुमारे ५००० एनएचएम आशांची गरज आहे परंतु त्या ऐवजी फक्त ७०० आशा नेमल्या गेल्या आहेत. उर्वरित सुमारे ४३०० एनएचएम आशांची भरती करण्याचा व त्या जागांवर बीएमसी आशांना समाविष्ट करण्याचा प्रस्ताव एनएचएम व राज्य शासनाकडे पाठवून तो मंजूर करवून घेण्याची मागणी यापूर्वी केली होती व या विषयावर १८ जुलै रोजी संघटनेच्या शिष्टमंडळासोबत चर्चा झाली होती. एनएचएमच्या नव्याने निर्माण होणाऱ्या जागांवर बीएमसीने स्वतः नेमलेल्या आशांना समाविष्ट करून घेण्याबाबत बीएमसीने एनएचएम व राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवल्याचे समजते.

## माहीम येथे इमारतीतील सदनिकेला आग

**मुंबई:** माहीम येथील जैन मंदिरानजीकच्या कपडे बाजारातील एका इमारतीमधील एका सदनिकेत सोमवारी सकाळी आठच्या सुमारास अचानक आग लागली. या दुर्घटनेत कोणीही जखमी झाले नाही. मोहित हाईट्स या अकरा मजली इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील सदनिका क्र. ४०३ मध्ये सोमवारी सकाळी आग लागली. दुर्घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन मदतकार्य हाती घेतले आणि आगीवर तात्काळ नियंत्रण मिळविले. या आगीत विद्युत यंत्रणा, विद्युत तारा, एसी, इतर घरगुती सामान जळून खाक झाले.

## 77व्या वार्षिक निरंकारी संत समागमाच्या सेवेचा शुभारंभ




***समालखा:*** *आध्यात्मिक स्थळ, समालखा, हरियाणा येथे होऊ घातलेल्या 77व्या वार्षिक निरंकारी संत समागमामध्ये पोहचून मानवतेच्या महाकुंभमेळ्याचे दृश्य साकार करणार आहेत. देश-विदेशातून येणारे भक्तगण जिथे सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि सत्कारयोग्य निरंकारी राजपिता रमितजी यांचे पावन दर्शन घेऊन कृतार्थतेचा अनुभव घेतीलच, शिवाय एकोप्याने संत समागमातील शिकवणूकीतून आपली मनं उज्ज्वल करण्याचाही प्रयास करतील. या संत समागमाची भूमी समागमासाठी तयार करण्याच्या सेवेचा शुभारंभ रविवारी 6 ऑक्टोबर रोजी प्रतिवर्षाप्रमाणे सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या शुभहस्ते करण्यात आला. याप्रसंगी मिशनच्या कार्यकारिणीचे सर्व सदस्य, केंद्रीय सेवादल अधिकारी आणि सत्संगचे हजारो अनुयायी उपस्थित होते.*



तुमच्या रोजच्या कामापेक्षा स्वत:चे व्यक्तिमत्त्व खुलवण्यावर अधिक भर द्या.



- जिम रॉन
प्रसिद्ध अमेरिकन उद्योगपती आणि लेखक

वृत्तमानस
मुंबई, मंगळवार, ८ ऑक्टोबर २०२४

# योग्य पाऊस झालाय, योग्य हमी भाव द्या

यंदा देशभरात चांगला पाऊस पडल्याने शेतीला आणि त्यावर निगडीत असणाऱ्या अर्थव्यवस्थेला गती मिळण्याची शक्यता आहे. गेली दोन ते तीन वर्षे पावसाचे प्रमाण अचानक कमी झाल्याने काही ठिकाणी दुष्काळी स्थिती तसेच पाणीटंचाईचेसुद्धा संकट ओढवले होते. यंदा सरासरीपेक्षा जास्त पर्जन्यमान झाल्याने धरणे ओसंडून वाहत असल्याने पाणीटंचाईचा किमान सध्या तरी सामना करावा लागणार नाही. देशभरात चांगला पाऊस पडला असल्याने किमान महागाई नियंत्रणात राखता येईल, असा आशावाद पाहायला मिळत आहे. अर्थविश्वाला दिलासा देणाऱ्या बाह्य घटकांमध्ये चांगल्या पावसाच्या शक्यतेचा समावेश होतो. या अंदाजामुळे अर्थव्यवस्थेला दिलासा मिळतो. भारतातर्फे होत असणाऱ्या सेवानिर्यातीत मोठी वाढ होत असल्याची बातमी आशादायक असून, त्याचबरोबर लघू उद्योजक, व्यावसायिकांना जागतिक बाजारपेठ खुली होत असल्याची शुभवार्ता दखलपात्र ठरावी. समाधानकारक पावसाने खाद्यपदार्थांच्या किमती आटोक्यात राहण्याची तसेच कमी होण्याची सरकारची अपेक्षा आहे. परकीय चलनाची मजबूत आवक आणि अनुकूल व्यापार तूट यांमुळे रुपया अधिक चांगल्या श्रेणीमध्ये राहण्याची अपेक्षा आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे आगामी काळात खाद्यपदार्थांच्या किमतींमध्ये आणखी घसरण होण्याची शक्यता आहे. कारण मान्सूनच्या काळात सामान्यपेक्षा जास्त पाऊस पडला आहे. पावसाचे चांगले वितरण झाल्याने उत्पादन अधिक होऊ शकते. त्याचा थेट परिणाम आर्थिक चक्रावर होतो. यंदा देशात सरासरीच्या १०८ टक्के पाऊस पडला. मागील काही काळात अल निनोचा मोठा परिणाम पाहावयास मिळत होता. मोसमी पावसाच्या सुरुवातीच्या काळात प्रशांत महासागरात एल निनो स्थिती सक्रिय होती. त्याचा जून-जुलैमधील पावसावर परिणाम होण्याची शक्यता होती, पण प्रत्यक्षात तसे घडले नाही. जून, जुलैमध्ये चांगला पाऊस झाला. जुलैअखेरीस प्रशांत महासागरातील एल निनो पूर्णपणे निष्क्रिय झाला होता. सध्या तो तटस्थ अवस्थेत असल्याचे समजते. भारतीय हवामान विभागासह जगभरातील हवामानविषयक संस्था ऑगस्टअखेरीस ला निना स्थिती निर्माण होण्यास सुरुवात होईल, असे अंदाज व्यक्त करीत होत्या. प्रत्यक्षात अद्याप ला निना स्थिती निर्माण झाली नाही. तरीही देशात अत्यंत समाधानकारक पर्जन्यवृष्टी झाली. हिंदी महासागरातील द्विध्रुविता पावसाळ्यात सक्रिय होण्याची शक्यता होती. पण सप्टेंबरअखेर आयओडीही तटस्थ राहिला आहे. म्हणजेच एल निनो सक्रिय असताना, एल निनो निष्क्रिय झाला असताना आणि ला निनाची स्थिती आणि आयओडी सक्रिय झाला नसतानाही देशात चांगले पाऊसमान राहिले. हवामान विभागाने १९५१ पासून २०२३ पर्यंत कोणत्या वर्षी ला निनाची स्थिती होती याचा अभ्यास केला. त्यात किमान २२ वर्षे ला निनाची स्थिती होती. पण त्यापैकी बहुतांश वर्षी पावसाचं प्रमाण हे सरासरी, सरासरीपेक्षा जास्त किंवा अतिवृष्टी झाल्याचं दिसून आले आहे. त्यात अपवाद फक्त १९७४ आणि २०००चा होता. यावर्षी सरासरीपेक्षा कमी पाऊस पडला. एल निनोचा प्रभाव कमी होत असतानाच ला निनोचा प्रभाव वाढत जातो तेव्हा समाधानकारक पाऊस होतो. विशेष म्हणजे गेल्या वर्षीपर्यंत नोव्हेंबर ते मार्चदरम्यान महाराष्ट्रात अनेक ठिकाणी गारपीट व्हायची. पण यावर्षी तसं न घडता एप्रिल महिन्यात गारपीट झाली. त्यानंतर अपवाद वगळता कुठेही गारपीट झाली नाही. मुळात अल निनो म्हणजे काय याची कल्पना अजूनही अनेकांना अजिबातच नाही. एल निनो ही प्रशांत महासागरात तयार होणारी एक वातावरणीय स्थिती आहे. प्रशांत महासागराच्या पाण्याचं तापमान जेव्हा नेहमीपेक्षा जास्त वाढतं तेव्हा त्या स्थितीला एल निनो असं संबोधलं जातं. प्रशांत महासागरातील पाण्याचं तापमान साधारणपणे २६ ते २७ अंश सेल्सिअसपर्यंत राहते. त्यात आणखी जास्त वाढ होऊन ते ३२ ते ३४ अंश सेल्सिअसपर्यंत होऊ शकते, या स्थितीला सुपर एल निनो म्हणतात. आपल्याकडे १ जून ते ३० सप्टेंबर या काळाला पावसाळा संबोधले जाते. जूनच्या सुरुवातीला केरळमध्ये पाऊस दाखल होतो. यंदा एक दिवस अगोदर ३० मे रोजीच केरळमध्ये मोसमी पाऊस दाखल झाला होता. साधारण ८ जुलै रोजी मोसमी वारे संपूर्ण देश व्यापतात. यंदा सहा दिवस अगोदरच म्हणजे २ जुलै रोजी मोसमी वाऱ्यांनी सर्व देश व्यापला होता. पावसाळ्याच्या चार महिन्यांत देशात सरासरी ८६८.६ मिमी पाऊस पडतो. यंदा सरासरीपेक्षा ७.६ टक्के अधिक ९३४.८ मिमी पाऊस पडला आहे. उत्तर भारतात सरासरीपेक्षा सात टक्के अधिक ६२८.६ मिमी पाऊस पडला. राज्यात यंदाच्या पावसाळ्यात सरासरीपेक्षा २६ टक्के जास्त पाऊस झाला आहे. पावसाळ्यात राज्यात सरासरी ९९४.५ मिमी पाऊस पडतो, मात्र यंदा १२५२.१ मिमी पाऊस पडला आहे. कोकण विभागात २९ टक्के, मध्य महाराष्ट्रात ३९ टक्के अधिक पाऊस पडला आहे. मध्य महाराष्ट्रात १०३५.८ मिमी तर मराठवाड्यात २० टक्के अधिक पाऊस पडला आहे. विदर्भात १७ टक्के अधिक पाऊस पडला आहे. राज्यातील सात जिल्ह्यांत सरासरीपेक्षा ४० टक्क्यांहून जास्त पावसाची नोंद आहे. सरासरीच्या तुलनेत सर्वाधिक ४९ टक्के पाऊस नगर जिल्ह्यात झाला आहे. नगरसह सिंधुदुर्ग, जळगाव, कोल्हापूर, नंदुरबार, नाशिक, पुणे आणि सांगली या जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा ४० टक्क्यांहन अधिक पाऊस पडला. थोडी चिंतेची बाब म्हणजे हिंगोलीत सरासरीपेक्षा ३५ टक्के तर अमरावतीत सरासरीपेक्षा दोन टक्के कमी पाऊस झाला आहे. पावसाचा नवा अवतार या वेळी पाहावयास मिळत आहे. परतीचा पाऊस अजूनही आपले दमदार अस्तित्व दाखवत असताना ढगफुटीसारख्या घटना वाढत असल्याने त्याचा मोठा फटका बसत आहे. पावसाळ्याच्या चार महिन्यांत मुसळधार पावसाच्या एकूण ५२५ घटना घडल्या तर अति मुसळधार पावसाच्या ९६ घटना घडल्या. मुसळधार आणि अति मुसळधार पावसाच्या घटना गेल्या पाच वर्षांच्या तुलनेत वाढल्या आहेत. केरळमध्ये मुसळधार आणि पूरस्थितीच्या सर्वाधिक ३९७ घटना, त्याखालोखाल आसाममध्ये १०२, मध्य प्रदेशात १०० आणि महाराष्ट्रात ३३ घटना घडल्या आहेत. असे असूनही पावसाळ्यातही उष्णतेच्या लाटेचा फटका झारखंडला बसला. एकूण १३ वेळा उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागला. ही विषमता कशामुळे आली याचा सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. २४ ते २६ सप्टेंबर या काळात देशभरात पावसाचा जोर जास्त होता. या काळात सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. सप्टेंबर महिन्यात तीन ठिकाणी कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले. त्यांपैकी दोन क्षेत्रांचे तीव्र कमी दाबाच्या क्षेत्रात रूपांतर झाले. परिणामी देशभरात चांगला पाऊस झाल्याचे स्पष्ट होते. सर्वसाधारणपणे पावसाळा चार महिन्यांचा असला तरीही मोसमी वारे देशात दाखल होऊन संपूर्ण देश व्यापण्यासाठी जुलै महिना उजाडतो आणि सप्टेंबर मध्यापासून म्हणजे साधारण १७ सप्टेंबरपासून माघारी फिरतो. त्यामुळे जुलै आणि ऑगस्ट हे दोन महिने पावसाळ्यातील प्रमुख महिने ठरतात. साहजिकच या दोन महिन्यांत पडणारा पाऊस महत्त्वाचा ठरतो. पेरणीसाठी असणारा अनुकूल काळ यंदा शेतकऱ्यांना मिळाला असल्याने पीकपाणी उत्तम येण्याची आशा आहे. शेतीचे उत्पादन वाढल्यास त्याचा फायदा शेतकऱ्यांना होणार आहे. त्यासाठी सरकारने योग्य हमीभाव देणे महत्त्वाचे ठरते. त्याचबरोबर निर्यातीलासुद्धा प्राधान्य दिल्यास ते फायदेशीर ठरणार आहे. आपला देश हा शेतीप्रधान आणि अर्थव्यवस्थासुद्धा त्यावर अवलंबून असल्याने शेती आणि शेतकरी या देशाचा कणा आहे याचा विसर कोणालाही न पडावा. योग्य पाऊस झालाय त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य हमीभाव देणे महत्त्वाचे आहे.

# राज्यमातेच्या दोन पायांच्या शेतकरीपुत्रांसाठी...

## गोवंशहत्याबंदी कायदा आणि त्याचे परिणाम

आनंद शितोळे

महाराष्ट्रात अनेक ठिकाणी जनावरांचे बाजार भरतात. आमच्या नगर जिल्ह्यात वाळकीला, बोधेगावला, राशीनला, लोणीला, घोडेगावला, काष्टीला भरणारे आठवडे बाजार जनावरांच्या व्यापारासाठी प्रसिद्ध आहेत. एकेकाळी कोटींनी उलाढाल होणारे बाजार भाकड गाई सारखेच भाकड झालेत.

सगळ्या महाराष्ट्रात बाजारात जनावर विकायला गेल तर गिऱ्हाईक नाही, असलच तर अगदीच शुल्लक भाव मिळतोय, भाकड गाई विकून नव्याने दुभती जनावर घेण्याच चक्र पूर्णपणे थांबलंय , ह्याला कारणीभूत असणारा सगळ्यात महत्वाचा भाग म्हणजे महाराष्ट्र सरकारचा गोवंश हत्याबंदी कायदा.

व्यक्तिगत पातळीवर भावनेच्या भरात घेतलेला निर्णय अंगलट आला तरी तो त्या व्यक्तीपुरता मर्यादित असतो पण सरकारी पातळीवर भावनेच्या आहारी जाऊन घेतलेला निर्णय लाखो लोकांच्या जीवनावर वेगवेगळ्या तऱ्हेने कसा प्रतिकूल परिणाम करतो ह्याच उत्तम उदाहरण म्हणजे महाराष्ट्र सरकारचा गोवंश हत्याबंदी कायदा.

घटनात्मक पातळीवर बघायला गेल तर हा सरळ सरळ व्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच आहे

घटनेने भारतीय नागरिकाला आहार ,विहार , विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य दिलेलं आहे. अशावेळी तुम्ही अमुक गोष्ट खाऊ नका अस सांगणार सरकार कोण ? एखाद्या विशिष्ट समुदायाच्या भावना दुखावतात म्हणून तुम्ही कायदा करता आणि दुसऱ्याच्या भावना दुखावता ? मग हा असला कायदा काय कामाचा ? न्यायालयात ह्या कायद्याला दिलेलं आव्हान पाहता हा कायदा न्यायालयात किती टिकू शकेल ह्याची शंकाच आहे.

सामाजिक पातळीवर आणि आरोग्याच्या बाबतीत पाहायला गेल तरी ह्या कायद्याचा फोलपणा लक्षात येतो.

मुस्लीम , भटक्या जाती , मागासवर्गीय , बौध्द धर्मीय आणि हिंदू समाजातल्या अनेक समुदायात गोवंशाच मटण सर्रास खाल्ल जात. बोकड , मेंढी किंवा कोंबडी च्या मांसापेक्षा निम्म्या पेक्षा कमी किमतीत हे मांस उपलब्ध होत आणि प्रथिन मिळवायला हा उत्तम उपाय आहे.

आभाळाला भिडलेले पालेभाज्या आणि इतर भाज्यांचे भाव पाहता दोन वेळच्या जेवणाची भ्रांत असलेल्या माणसाला ७०-१०० रुपयात पोटभर जेवण मिळत असेल तर त्याने गोवंश मांसाचा पर्याय स्विकारला तर त्यात नवल ते काय ?

बर एकदा गोवंश मांसबंदी झाली कि ह्या लोकांना भाजीपाला खाण्याशिवाय पर्याय नाही , म्हणजे पुन्हा आहे ती महागाई अजून वाढणार आणि भाजीपाला अजून महाग होणार.

मग आर्थिकदृष्ट्या ज्यांची ऐपत नाही महाग भाजीपाला खरेदी करण्याची त्यांनी पोषक अन्न घेऊच नये आणि जगूच नये असा तरी फतवा काढावा एकदा सरकारने.

असा कायदा आणून सरकारने सरळ सरळ ह्या आर्थिकदृष्ट्या कमजोर वर्गाच्या पोटावर पाय दिलेला आहे.

ह्या गोवंशाच्या जनावरांच्या उपयोगाच आणि व्यापाराच अर्थकारण काय सांगत ?

भारताची बीफ निर्यात ( ज्यात म्हशीचे मांस अंतर्भूत नाही) २०१२-१३ मध्ये ११ लाख मेट्रिक टन बीफ निर्यात केलीय ज्याची किंमत १७४१२ कोटी रुपये आहे. २०१३-१४ मध्ये १४.४९ लाख मेट्रिक टन बीफ निर्यात केलीय ज्याची किंमत २६४५७ कोटी रुपये आहे. २०१४-१५ मध्ये १४.७५ लाख मेट्रिक टन बीफ निर्यात केलीय ज्याची किंमत २९२८२ कोटी रुपये आहे.

जर सरकारला गोवंश हत्याबंदी धार्मिक आधारावर खरोखर करण्याची इच्छा असेल तर थेट सगळ्या देशात लागू करावी आणि वरचे निर्यातीचे आकडे थेट शून्यावर आणावेत.

हि निर्यात नेमकी होते कुठून ? जिथे हत्याबंदी कायदा नाही तिथून खरेदी करून, किंवा भाकड जनावर वाहतूक करून त्या बंदी नसलेल्या राज्यात नेऊन, बर हत्याबंदी असलेल्या भागात जनावर खरेदी करायची कुणाची हिंमत नाही, खरेदीदार नाहीत त्यामुळे विक्री करायचा प्रश्नच नाही.

आणि हा मांसाच्या व्यापाराचा आर्थिक आकडा फक्त मांसाचा आहे.गाईच्या शरीराच्या एकूण वापराच्या फक्त ३० टक्के, होय फक्त ३० टक्के. मग उरलेल्या ७० टक्क्यात काय येत.

गाईच्या शिंग आणि खुरांचा उपयोग कृत्रिम अलंकार , कोटाची बटण आणि अग्निशमन यंत्रात वापरल्या जाणाऱ्या पावडर मध्ये होतो. गाईच्या हाडांचा उपयोग साबण, टूथपेस्ट, साखरेला अधिक शुभ्र करण्याच्या प्रक्रियेत होतो. गाईच कातड बूट, चपला, ब्याग, बेल्ट करायला वापरल जात, त्यापासून तयार होणार जिलेटीन जेली व अन्य खाद्यपदार्थात होतो, औषधी कॅप्सूल च आवरण ह्याच जिलेटीन पासून बनवल जात. गाईच्या रक्तापासून तयार होणार सिरम हिमोग्लोबिन आणि आयर्न टोनिक बनवायला वापरल जात तसच बूट पोलिश मध्ये वापरल जात. गाईची चरबी खारी आणि बिस्कीट कुरकुरीत करायला वापरली जाते. पेंटिंग चे ब्रश आणि डस्टर आणि वेगवेगळे ब्रश गाईच्या शेपटीच्या केसापासून बनवले जातात. गाईच्या ग्रंथी पासून वेगवेगळी प्रतिजैविक बनवली जातात ( इन्सुलिन , ट्रीपटेन , हेपेरीन , पेप्सीन ) गाईच्या आतड्यापासून सर्जरी मध्ये टाके घालण्याचा दोरा तयार होतो, टेनिस च्या रेकेट चा धागा , व्हायोलिन च्या तारा आणि अन्य संगीत वाद्यात वापरल जात.

असे गाईचे उपयुक्त पशु म्हणून असणारे अन्य उपयोग आहेत ज्यावर शेकडो नव्हे हजारो लाखो लोकांचे रोजगार, उद्योग व्यवसाय अवलंबून आहेत.

गोवंश हत्याबंदीच हे खूळ धार्मिक कारणाच्या आडून केलेलं वेगळ षडयंत्र आहे हे मी म्हणतोय ते एवढ्यासाठी. आणि ह्या कटाचे बळी आहेत मुस्लीम आणि ग्रामीण भागातले शेतकरी.

हे सरकार शेतकऱ्याच्या मुळावर उठलेल सरकार आहे ते एवढ्यासाठी. आणि हा हजारो लाखो कोटींचा व्यवसाय असणारा बीफ च्या निर्यातीचा आणि गाईच्या उरलेल्या अंगाच्या व्यवसायाचा खेळ सरकार मोडू देत नाहीये. आजही बीफ निर्यात चालू आहे, आणि वर उल्लेख केलेले सगळे व्यवसाय सुद्धा चालू आहेत. ह्या सगळ्या हुच्च लोकांना जर खरोखर गाय माता म्हणून उरबडवे पणा करायचा असेल तर आधी केंद्र सरकारला सांगून संपूर्ण बीफ निर्यात बंद करावी. अशी निर्यात बंद केली आणि गोवंश कत्तल बंद केली कि मग कसे लाखोनी उद्योगपती, कामगार आणि गुंतवणूकदार उरावर बसतील ते समजेल.

शास्त्रीयदृष्ट्या पाहायला गेल तरी हा कायदा अजिबात टिकणारा नाही. जंगलातल्या अन्नसाखळीत वाघाच स्थान महत्वाच आहे. “जीवो जीवस्य जीवनम“ लहान कीटक, फुलपाखरू, मधमाशी पासून वाघापर्यंत सगळे एकमेकांवर अवलंबून आहेत.

माणसाची अशीच अन्नसाखळी आहे. माणूस शाकाहारी आहे तसाच मांसाहारी सुद्धा आहे. मांसाहार करणारे बहुतांशी गोवंश, शेळ्या, मेंढ्या, डुकर, कोंबड्या आणि मासे खातात. जमिनीवर रहाणारे प्राणी माळरानावर असलेल गवत खातात आणि काही प्रमाणात खास प्राण्यासाठी पिकवलेला चारा खातात. भारतापुरता विचार केला तर ग्रामीण भागात पाळीव गुर चरायला माळरानावर जातात जिथे शेती होत नाही. ह्या माळावर उगवणारा चारा नैसर्गिक पाण्याचे स्त्रोत म्हणजे पावसावर उगवतो , त्याला वेगळ काही सिंचन केल जात नाही. गोवंश बंदी नंतर असणारे प्राणी जिवंत ठेवायला हा माळरानावर असलेला उपलब्ध चारा अपुरा पडेल आणि जनावर उभ्या पिकात घुसतील. बर हिंसा नको म्हणून हे प्राणी जर मारता येत नसतील तर ह्या गोवंशातल्या प्राण्यांची संख्या अनियंत्रितपणे वाढेल. खाण्यासाठी त्यांच अतिक्रमण जस शेतीवर होईल त्याचबरोबर ह्या पाळीव प्राण्यांच्या संयोगाने होणारे आजार पण माणसात वाढतील. ह्या भाकड जनावरांना रोज खायला लागणारा ३० किलो चारा आणि ६० लिटर पाणी ह्याचा हिशोब केला तर वर्षाला ३५००० रुपये एका भाकड जनावराला लागतील ज्याची कुठलीही तरतूद सरकारने केलेली नाहीये.

आणि हा चारा कायद्याच्या बडग्याने विकत घ्यायचा ठरला तरी चाऱ्याच उत्पादन कायम असल्यामुळे दुभत्या आणि कामाच्या जनावराच्या तोंडून घास हिसकावून भाकड जनावराला पोसण भाग पडणार आहे.

दुसरा अतिशय गंभीर असणारा भाग म्हणजे ह्या भाकड जनावाराकडून उत्सर्जित होणारा मिथेन वायू जो पर्यावरणाला अतिशय घातक असून कार्बन डायऑक्साईड पेक्षा २१ पट जास्त उष्णता निर्माण करतो जो ग्लोबल वार्मिंग ची समस्या अजून गंभीर करणार आहे.

जगातल्या पशुंकडून होणाऱ्या मिथेन वायूच्या उत्सर्जनपैकी १३ टक्के वायू फक्त भारतीय पशु निर्माण करतात आणि ह्या कायद्याने हे प्रमाण अजून वाढेल. पृथ्वी तापून , पर्यावरण बिघडून, समतोल नष्ट होऊन पावसाच प्रमाण घटल तरी चालेल, रोगराई निर्माण झाली तरी चालेल, उष्णतेने माणस मेली तरी चालतील पण धर्म टिकला पाहिजे.

ह्या पाळीव प्राण्यांना मांसाचा स्त्रोत म्हणून वापरताना असेलेली आर्थिक बाजूही लक्षात घ्यायला हवी. गोवंशातले प्राणी जेव्हा शेतीच्या कामाला किंवा दुध द्यायला निकामी ठरतात तेव्हाच त्यांची विक्री होते आणि आलेल्या पैशातून नवीन जनावरांची खरेदी होऊन चक्र सुरु राहत. गोवंश पालन भारतात ग्रामीण भागात शेतीला जोडधंदा म्हणून केल जात आणि काही ठिकाणी अल्पभूधारक शेतकरी आपल संपूर्ण कुटुंब ह्याच व्यवसायावर जगवतो. दुभती जनावर दुध देतात त्यांच्या दुधाच्या विक्रीतून आलेला पैसा चरितार्थ चालवायला उपयोगी पडतो. बैल आणि गोऱ्हे विक्री करून त्यापासून आलेला पैसा पुन्हा नवीन दुभत्या गाई विकत घ्यायला वापरला जातो आणि हे अर्थचक्र चालू राहत.

पुन्हा शेतकऱ्यावर केला जाणारा आरोप म्हणजे पोटच्या पोरासारखी वाढवलेली जनावर कशी विकता ? मुळात भाकड झालेली गाय विकताना शेतकरी काही आनंदाने विकत नाही, पण स्वतःच्या जगण्याचा प्रश्न आणि आर्थिक रेटा असा असतो कि दुसरा पर्याय उरत नाही.

घरच्या गाईला कालवड झाली तर ती घरीच राहते, पण गोऱ्हा झाला तर ठराविक वयात त्याला विकाव लागत कारण आता बैलाच्या मदतीने शेतीची मशागत परवडत नाही. यांत्रिक पद्धतीने शेती केली जात असताना बैल संभाळण कठीण होऊन जात.

ह्या कायद्याने जनावर बाजारात विकून नवीन दुभती जनावर घेण्याचा मार्गच आता बंद झालेला आहे. ह्याही बाबतीत सरकारच धोरण अनाकलनीय आहे.एकीकडे सरकार शेतीपूरक उद्योगांना अनुदान देत , सोसायट्या , जिल्हा बँका , जिल्हा परिषद गाई बैल घ्यायला कर्ज देतात. पण जर हे जनावर खरेदी विक्री च चक्रच ठप्प झाल तर ह्या योजनेला अर्थ तरी काय राहिला ?

भावनिक पातळीवर सरकार दबाव आणून हा कायदा करणाऱ्या लोकांची काही आवडती गृहीतक आणि सिद्धांत आहेत.

गोमुत्र आणि शेण ह्यापासून खत आणि कीटकनाशक तयार करण. मुद्दलात हे ज्ञान जन्मल्यापासून शेतीत असलेल्या माणसांना अजिबातच नसेल का ? कि असले उद्योग आधी झालेच नाहीत का? पण भाकड जनावर पोसण्याचा खर्च आणि ह्या गोमुत्र आणि शेणाच्या व्यवसायातील उत्पन्न ह्याचा मेळ बसतो का ह्याचा कुणीही विचार करत नाही. दुसर आवडत गृहीतक किंवा समाधान म्हणजे आम्ही गोमातेच्या रक्षणार्थ काहीही करायला तयार आहोत. अस म्हणून गोशाला काढून भाकड गाई बैल सांभाळायची तयारी दाखवण. ह्या भाकड गाई आणि बैल काही हवेवर जगणार नाहीत, ह्यांना चारा आणि पाणी लागणार कि नाही ?

चारा ? चारा आम्ही बाजारातून विकत घेऊ. मग बाजारात येणारा चारा तुम्ही विकत घेणार असला तर मागणी पुरवठा गणितानुसार चार्याचे भाव वाढणार. गोशालेला सरकारी अनुदान असेल किंवा दानशूर लोकांची देणगी असेल, त्यांना वाढीव किमतीला चारा घेण परवडेल एकवेळ, पण ज्या शेतकऱ्याकडे दुभती जनावर आहेत त्याने मार्केट कमिटीत येऊन चार्याचे भाव बघितले तर त्याला झीट येऊन पडेल.

मग दुभती जनावर जगवायला त्याने चारा घ्यावा तरी कुठून ? म्हणजे दुभती जनावर चारा नाही म्हणून खायला महाग होऊन मरणार आणि त्यांच्या वाट्याचा चारा जास्ती किमतीला घेतला म्हणून भाकड जनावर जगणार ? हा न्याय अकलेच्या बाहेरचा आहे.

कुठल तरी पाणी तुम्ही वळवून ह्या जनावरांना देणार आहात म्हणजे शेतीच तरी पाणी वळवणार नाहीतर पिण्याच तरी वळवणार, म्हणजे तुमच्या भावनेच्या खेळासाठी तुम्ही शेतीच नुकसान करणार आणि माणसांना प्यायला पाणी मिळू देणार नाही असच ना ?

या कायद्याच्या बाजूने बोलणारे भावनिक कढ काढून "म्हातारे आईबाप आपण कसायला विकतो का ? " म्हणून प्रश्न विचारतात. हे भावनिक आवाहन खर असेल तर भारतात अजूनही वृद्धाश्रम अस्तित्वात का आहेत ? वृद्धाश्रम शहरात आहेत आणि ग्रामीण भागात का नाहीत ? शेतकरी कुटुंबातली माणस आईबापांना वृद्धाश्रमात नेऊन ठेवतात का ? मग हे असे भावनिक कढ काढायचे असतील तर शेतकऱ्यांनी हि भाकड जनावर थेट या शहरी धर्मरक्षकांच्या सदनिकेत आणि बंगल्यात का बांधून ठेवू नयेत ?

हा कायदा सरकारच्या एका खात्याच्या धोरणांना छेद देतो हे ठाऊक आहे का ? सरकारचा पशुसंवर्धन विभाग शेतकऱ्यांना पशुपालन करायला प्रोत्साहन देण्यासाठी बैल, गायी विकत घ्यायला कर्ज देतो.शेतकरी भाकड जनावर विकून त्यात काही पैसे स्वतःचे, काही सरकारी योजनेतले कर्ज घेऊन नवीन जनावर विकत घेतो. या कायद्याने हि भाकड जनावर विकली जाण्याची प्रक्रिया ठप्प झालेली आहे, मग नवीन जनावर विकत घ्यायला पैसे कुठून आणायचे हा साधा प्रश्न कायदा करणाऱ्या लोकांना पडत नाही.

शेतकऱ्यांना बळीराजा वगैरे म्हणून कौतुक करून हरबऱ्याच्या झाडावर चढवण्यापेक्षा महाविकास आघाडी सरकारने हा कायदा रद्द करून दुधाचा धंदा वाचवावा आणि शेतकऱ्यांना उपयुक्त असलेला जोडधंदा पुन्हा सुरळीत चालेल याची व्यवस्था करावी.

मग काही माणसांच्या भावनांच्या आहारी जाऊन हजारो शेतकऱ्यांच्या पोटावर पाय देऊन, गरिबांच्या ताटातले अन्न हिरावून घेऊन सरकार कोणत्या तोंडाने आम्ही तुम्हाला लोककल्याणकारी राज्य देणार अस सांगत आहे ?

## पत्र मानस

### 'किनमेमाई' तांदुळाचा भाव एका किलोला दहा हजार रुपये .... 'कालाय तस्मे नम:'

जगात काही गोष्टी ऐकावे ते नवलच ...! जपान मध्ये सध्या तांदुळाची प्रचंड टंचाई आहे . तेथे किनमेमाई" या जातीच्या तांदुळाचा भाव किलोला दहा हजार रुपये एवढा प्रचंड आहे . १७ वर्षांपूर्वी ही जात विकसित करण्यात आली होती . या तांदुळाची वैशिष्ठे म्हणजे या तांदुळात अधिक प्रतिकार शक्ती आहे . यामध्ये पौष्टिक मूल्य सुद्धा अधिक आहे . हा तांदूळ चांगले आरोग्य राखणारा आहे . तसेच आजाराशी तो खाल्यानंतर चांगला सामना देऊ शकतो ही बातमी नुकतीच वाचली .जपान मध्ये हा तांदूळ १४० ग्रॅमच्या पाकिटात उपलबध होतो . गेल्या आठ वर्षांपूर्वी या तांदुळाचा भाव किलोला सुमारे नऊ हजार शंभर रुपयांवर गेला होता . भारताचा विचार केल्यास अत्यंत चांगल्या दर्जाच्या तांदुळाला भारतात किलोला सर्वसाधारण पणे ३००- रुपये मोजावे लागतात . मध्यंतरी मध्य प्रदेशात सुद्धा आंब्याची एक जात अत्यंत महागडी विकसित करण्यात आली होती . विशेष म्हणजे लोक सुद्धा असे महागाडे तांदूळ किंवा आंबे आवडीने खरेदी करत आहेत . हल्लीच्या काळी लोकांना पैशाचे महत्व फारसे वाटेनासे झाले आहे . ही परिस्थिती सुमारे तीस चाळीस वर्षांपूर्वी नव्हती . अर्थात ही चांगली घटना आहे यात शंका नाही . त्या काळात चांगली फळे घेण्याची लोकांची ऐपत नव्हती . आज ती परिस्थिती राहिलेली नाही एकूणच आज अन्नधान्य भरपूर पिकत आहे . तसेच लोकांची क्रयशक्ती सुद्धा वाढलेली आहे . शेतीमध्ये विविध प्रयोग करून विविध जातीची व रंगाची फळे निर्माण होत आहेत . भाजीपाल्याच्या अनेक जाती सुद्धा बाजारात येत आहेत . ही सारी काळाची किमया आहे म्हणून म्हणावेसे वाटते " कालाय तस्मे नमः

**- शांताराम वाघ पुणे**

### मंत्र्यांची दिवाळी, तर सरकारचे दिवाळे ?

सध्या महायुती सरकारकडून जोरदार निवडणूकीची तयारी करतांना मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यात दिवसागणिक अनेक ठरावांची भर पडत आहे. बहुदा निवडणूक आचारसंहितेपूर्वी हे ठराव सत्र चालूच राहण्याची शक्यता दिसते. वास्तविक राज्यावर साडेआठ लाख कोटींचे कर्ज, दोन लाख कोटींची वित्तीय तूट तर चोवीस हजार कोटींच्या पुरवणी मागण्या सादर केल्या गेल्या. त्यातच वित्तीय तूट मात्र प्रकर्षाने वाढताना दिसते. त्यामुळे आर्थिक खाते सांभाळणाऱ्या उपमुख्यमंत्र्यांनी याचा गांभीर्याने विचार करायला हवा. परिणामी अन्य विकास कामांना कात्री लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. लाडकी बहीणच सरकारचे दिवाळी काढणार असेच वाटते. महिलांचे सबलीकरण करण्यासाठी पैशांचे सोंग आणता येत नाही, याचे राज्यातील एका केंद्रीय मंत्र्यानेच सूतोवाच केले होते. राज्यात उद्योगधंदे यावेत म्हणून गुंतवणूकदारांना अनुदान देणे मुश्किल होणार आहे याची जाणीव विद्यमान सरकारने ठेवणे आवश्यक आहे. लोकांना सक्षम न करता सरसकट पैसे वाटण्यामुळे सरकारच्या देना बँकेचे दिवाळी निघणार आहे. त्यातच रोजच्या जाहिरातींवर कोट्यावधी रुपयांची उधळपट्टी केली जात आहे. एवढ्या जाहिराती आज पर्यंत कोणत्या सरकारने केल्या नव्हत्या. हा जनतेच्या करोरूपी पैशांचा अपहार केला जातोय असे वाटते. रस्ते कॉंक्रिटीकरण करण्याच्या नावाखाली ठेकेदारांवर पैशांची खैरात केली जात आहे. त्यातून चांगले रस्तेही निर्माण होत नसल्याचे दिसून येते. तसेच मंत्र्यांच्या बंगल्यांचे नूतनीकरण करून करोडो रुपयांची उधळपट्टी केल्याचे वास्तव समोर आहे. तर हिंदुत्वाचा मुद्दा पुढे करून सावरकरांच्या विचारांशी प्रतारणा करताना गाईला राज्यमातेचा दर्जा देऊन पन्नास रू.अनुदान देण्याची घोषणा करण्यात आली आहे. परंतु भाकड गाईंना त्यातून वगळले आहे. परिणामी स्वतःचे पक्ष वाढवण्यासाठी गेली तीन वर्षे राज्याच्या तिजोरीची वारे माप उधळपट्टी सुरू आहे. त्यामुळे राज्य अधोगतीकडे गेल्यास नवल वाटू नये जनतेने आता या सर्वांचा गांभीर्याने विचार करायला हवा. हा विकास नसून राज्याला दिवाळखोरीत नेण्याचा प्रयत्न आहे. अर्थात या नंतर येणाऱ्या सरकार पुढे आर्थिक अरिष्ट ओढवल्यास त्यास जबाबदार कोण ? हे सर्व पाहून मंत्र्यांची दिवाळी तर सरकारचे दिवाळी अशीच काहीशी स्थिती आहे.

**- पांडुरंग भाबल,भांडुप.** ■

## अतिक्रमण विभागाची तुर्भेत तोड कारवाई

**नवी मुंबई :** नवी मुंबई महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा.आयुक्त साहेब डॉ.कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व डॉ.राहुल गेठे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने तुर्भे विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली. नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील तुर्भे विभागाअंतर्गत श्री. अरविंद मनोहर ठोंबरे, घर क्र. 122, सेक्टर – 05, सानपाडा गांव, सानपाडा, नवी मुंबई, यांनी वरील नमुद पत्यावर प्रत्यक्ष ठिकाणी स्थळ पाहणी केली असता अंदाजे 750 चौ.मी. मोजमापाच्या क्षेत्रफळात विनापरवानगी अनधिकृतरित्या आर.सी.सी. स्वरुपात बांधकाम चालु असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर अनधिकृत बांधकामास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, 1966 चे कलम 54 अन्वये नोटीस बजावण्यात आलेलीहोती. परंतु, सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरुच होते.



# ठाणे जिल्ह्यात जागावाटपावरून काँग्रेस-ठाकरे सेना संघर्ष तीव्र

## ... तर ठाणे जिल्ह्यातून काँग्रेस हद्दपार होईल!

प्रतिनिधी
■ ठाणे

ठाणे जिल्ह्यातील ठाणे, कल्याण आणि भिवंडी या लोकसभा मतदारसंघातील 18 विधानसभा मतदारसंघापैकी किमान दोन जागा काँग्रेसला सोडा, अशी आग्रही मागणी काँग्रेसच्या वरिष्ठांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे केली आहे. यासाठी काँग्रेसने कल्याण पूर्व आणि कल्याण पश्चिम या मतदारसंघावर दावा केला आहे. मात्र, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाने देखील या दोन्ही मतदार संघावर दावा केल्यामुळे या जागेवरून महाविकास आघाडीत मिठाचा खडा पडला आहे. या पट्ट्यात काँग्रेसला एकही जागा मिळणार नसेल तर काँग्रेस ठाणे जिल्ह्यातून हद्दपार होईल, अशी भीती व्यक्त होत आहे.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत तळकोकण अर्थात रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग तसेच ठाणे जिल्ह्यातून उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना पूर्णपणे हद्दपार झाली आहे. ज्या कोकणावर आणि ठाणे जिल्ह्यावर शिवसेनेचा भगवा फडकत होता, त्याच कोकण, ठाण्यातून उद्धव ठाकरे यांची शिवसेना भुईसपाट झाली आहे. या निकालाकडे लक्ष वेधून काँग्रेसने उद्धव ठाकरे यांना सबुरीचा सल्ला दिला आहे.

महाविकास आघाडीची जागा वाटपाची बैठक येत्या काही दिवसांत पुन्हा होणार आहे. या बैठकीत कल्याण पूर्व आणि कल्याण पश्चिम मतदारसंघावरून काँग्रेस आणि उबाठा सेनेच्या नेत्यांमध्ये खडाजंगी होण्याची शक्यता आहे. कल्याण ग्रामीण मतदार संघात मनसेचा आमदार असल्यामुळे ही जागा उद्धव ठाकरे यांची शिवसेना लढणार आहे. शिवसेनेचे डोंबिवलीतील नेते पुंडलिक म्हात्रे यांचे पुत्र दीपेश म्हात्रे उद्धव ठाकरे सेनेत प्रवेश करणार असून त्यांना डोंबिवलीतून तिकीट देण्यात येणार आहे. मुंब्रा - कळवा मतदारसंघात राष्ट्रवादीचे जितेंद्र आव्हाड आमदार असल्यामुळे तेच पुन्हा निवडणूक लढवतील.

अंबरनाथ तसेच कल्याण पश्चिम मतदार संघात शिंदे सेनेचे आमदार असल्यामुळे या दोन्ही जागा उद्धव ठाकरे सेना लढणार आहे. उल्हासनगरमध्ये पप्पू कलानी यांचे पुत्र ओमी कलानी हे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढणार आहेत.

काँग्रेसच्या दाव्यानुसार कल्याण लोकसभा मतदारसंघातील सहापैकी तीन जागा उद्धव ठाकरे सेना, दोन जागा शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस लढणार असेल तर काँग्रेसने फक्त एका जागेवर समाधान मानावे का? असा प्रश्न काँग्रेस पदाधिकारी उपस्थित करत आहेत.

भिवंडी लोकसभा मतदारसंघातील सहापैकी तीन जागी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांचे उमेदवार असतील, दोन ठिकाणी ठाकरे सेना लढेल तर समाजवादी पार्टी बरोबर आघाडी असल्यामुळे काँग्रेसला भिवंडी पूर्वची जागा समाजवादी पार्टीला सोडावी लागेल. काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि समाजवादी पार्टीचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यात अत्यंत घनिष्ठ मैत्री असून या मैत्रीमुळेच उत्तर प्रदेशात काँग्रेस - समाजवादी पार्टीने अत्यंत चांगला निकाल दिला, याकडे या नेत्याने लक्ष वेधले.

समाजवादी पार्टीशी असलेली मैत्री बघता भिवंडी पूर्वची जागा समाजवादी पार्टीला सोडावी लागेल आणि ही जागा काँग्रेसच्या कोट्यातील असेल. त्यामुळे काँग्रेसकडे एकमेव जागा लढण्याचा पर्याय शिल्लक राहतो.

भिवंडी ग्रामीण मध्ये शिवसेनेचा विद्यमान आमदार असल्यामुळे या जागेवर उद्धव सेनेने दावा केला आहे तर भिवंडी पश्चिमेत भाजपचा आमदार असल्यामुळे ही जागा शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस लढणार आहे.

मुरबाडमध्ये भाजपचे विद्यमान आमदार असल्यामुळे या जागेवर देखील शरद पवार यांचा दावा असून शहापूरदेखील शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला जाणार आहे. कल्याण पश्चिममध्ये शिवसेनेचा विद्यमान आमदार असल्यामुळे या जागेवर उद्धव ठाकरे यांनी दावा केला आहे.

कल्याण पश्चिम मतदारसंघात दलित आणि मुस्लिम समाजाची निर्णायक मते आहेत. या दोन्ही समाजाने लोकसभा निवडणुकीत घेतलेल्या भूमिकेचा सर्वाधिक फायदा महाविकास आघाडीला झाला आहे. या मतदारसंघात उपरे नव्हे तर स्थानिक नेते निवडणूक लढण्यास इच्छुक आहेत. ही जागाही काँग्रेसला सोडली तर ठाणे जिल्ह्यातून काँग्रेसचे दोन उमेदवार निवडून येऊ शकतील, यासाठी शिवसेनेने एक पाऊल मागे यावे अशी मागणी काँग्रेसचे नेते करत आहेत. मात्र ही जागा काँग्रेसच्या पदरात पडली नाही तर याचा अर्थ भिवंडी लोकसभा मतदारसंघात काँग्रेसला काँग्रेसला एकही जागा लढता येणार नाही. तसे झाले तर काँग्रेस कार्यकर्ते निवडणुकीत काम करणार नाहीत आणि त्याचा फटका येणाऱ्या महापालिका निवडणूक देखील बसू शकतो.

महाविकास आघाडीच्या बैठकांमध्ये सर्वसाधारण सूत्र असे ठरले आहे की प्रत्येक लोकसभा क्षेत्रामध्ये महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांना किमान एक तरी जागा त्यांच्या वाट्याला यावी. यासाठी प्रत्येक मतदारसंघनिहाय चर्चा होत आहे.

ठाणे जिल्ह्यात ठाणे लोकसभा आणि भिवंडी लोकसभेत काँग्रेसला जागा मिळणार नाही हे चित्र स्पष्ट असल्याने किमान कल्याण लोकसभा क्षेत्रात तरी एक जागा काँग्रेसला मिळावी असा आग्रह काँग्रेस श्रेष्ठींनी धरला आहे.

कल्याण पूर्व मध्ये गेल्या तीन निवडणुकीत बाहेरचा उमेदवार लादल्यामुळे त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष फायदा भाजपला झाला आहे. 2014 मध्ये काँग्रेस आणि राष्ट्रवादी स्वतंत्र निवडणूक लढले, त्यावेळी गणपत गायकवाड हे अपक्ष म्हणून निवडून आले. त्याआधीही 2009 च्या निवडणुकीत गणपत गायकवाड अपक्ष निवडून आले होते. 2019 मध्ये गायकवाड भाजपच्या तिकिटावर निवडून आले. याचाच अर्थ बाहेरचा उमेदवार लागल्यामुळे या तिन्ही निवडणुकीत भाजपलाच फायदा झाला आहे.

सध्या कल्याण पूर्व मध्ये गणपत गायकवाड यांच्या बद्दल मतदारांमध्ये आणि भाजपमध्ये देखील नाराजी आहे. या संधीचा फायदा घेत महाविकास आघाडीने चर्चा करून आणि कुठलाही प्रतिष्ठेचा मुद्दा न करता ही जागा काँग्रेसला सोडली तर कल्याण पूर्वमधून काँग्रेसचा उमेदवार निवडून येऊ शकेल, असा दावा स्थानिक नेत्यांकडून केला जात आहे.

या मतदारसंघात काँग्रेसकडून निवडणूक लढण्यास स्थानिक, शिक्षित, पक्षाशी एकनिष्ठ आणि मतदारांशी सतत संपर्क असलेला नेता इच्छुक आहे. तर दुसरीकडे उद्धव ठाकरे यांची शिवसेना तीन आयात नेत्यांकडे उमेदवार म्हणून पाहते आहे. यातील महेश गायकवाड हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे शहर प्रमुख असून यांच्यावरच भाजप आमदार गणपत गायकवाड यांनी पोलीस ठाण्यात गोळी झाडली होती. अन्य दोन संभाव्य उमेदवारांमध्ये निलेश शिंदे आणि विशाल पावशे यांचे नाव घेतले जात आहे.

या तिन्ही नेत्यांनी शिवसेनेच्या एका वरिष्ठ नेत्याची नुकतीच भेट घेतल्याचे सांगितले जाते. त्यांनी उबाठा सेनेमध्ये प्रवेश करण्याची इच्छा व्यक्त केली आहे. उबाठा सेनेकडून या तिघांपैकी एकाला उमेदवारी देण्याचे घाटत आहे. शिवसेना फुटली त्यावेळी हे तिन्ही नेते एकनाथ शिंदे यांच्यासोबत होते, मात्र आता राज्यामध्ये सत्तांतर होऊन महाविकास आघाडीची सत्ता येण्याची शक्यता दिसू लागल्याने हे तिन्ही नेते शिंदे सेनेतून पुन्हा उद्धव सेनेत प्रवेश करून विधानसभेचे तिकीट मिळण्याचे स्वप्न बघत आहेत.

विधानसभा निवडणुकीत सांगली पॅटर्न होऊ देणार नाही, महाविकास आघाडीत बिघाडी होणार नाही याची काळजी उद्धव ठाकरे यांनी घ्यावी अशा प्रतिक्रिया काँगेस पदाधिकाऱ्यांच्या नुकत्याच झालेल्या मेळाव्यात व्यक्त झाल्या.

या मेळाव्यामध्ये काँग्रेस कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी अत्यंत तीव्र शब्दात भावना व्यक्त केल्या. पक्षाला एकही जागा मिळणार नसेल तर महाविकास आघाडीच्या कोणत्याही उमेदवाराचे काम करणार नाही, असा इशाराच काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी दिला आहे. दोन दिवसांत महाविकास आघाडीचे बैठक असून या बैठकीत काँग्रेसच्या मतदारसंघाचा तिढा सोडवा अन्यथा आम्ही निर्णय घेण्यास स्वतंत्र आहोत, असा इशाराच कल्याणमधील काँग्रेसच्या असंख्य कार्यकर्त्यांनी दिला आहे.

## नवी मुंबई बंगाली असोसिएशनतर्फे 9-13 ऑक्टोबरदरम्यान भव्य शारदोत्सव 2024 चे आयोजन

प्रतिनिधी
■ नवी मुंबई

नवी मुंबई बंगाली असोसिएशन (NMBA) ही महाराष्ट्रातील बंगालींसाठी एक प्रमुख सामाजिक-सांस्कृतिक केंद्र आहे. असोसिएशनच्या वतीने पाच दिवसीय शारदोत्सव सोहळा आयोजित करण्यात येणार आहे. पूर्णपणे वातानुकूलित असलेल्या सिडको एक्झिबिशन सेंटर, हॉल नंबर 1, सेक्टर 30, वाशी, (वाशी रेल्वे स्टेशनच्या पुढे) येथे हा सोहळा होणार असून, 1,50,000 चौरस फूट क्षेत्रफळातील या सेंटरमधील



कार्यक्रमाला 8 लाख हून अधिक लोक उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. पश्चिम बंगालमधील कारागिरांनी पवित्र गंगेच्या काठावरील जैव- विघटनशील माती वापरून बनवलेली 18 फूट मूर्ती पाहण्याजोगी असेल.

पारंपारिक पूजा विधींपासून ते देशभरातील कलावंतांच्या उत्कृष्ट

### संस्कृती-सामाजिक भावनेचा मिलाप झलकणार

निर्मितीचे सादरीकरण करत अर्पणांच्या प्रभावी सोहळ्याचा अनुभव यावेळी घेता येईल. या कार्यक्रमात कोलकाता आणि बॉलीवूडमधील प्रसिद्ध कलाकार, अन्वेषा, अनुपम रॉय, आकृती ककर आणि अभिजित भट्टाचार्य यांचा दमदार परफॉर्मन्स जाईल. NMBA सर्व भाविकांसाठी तीन दिवसीय मोफत भोग वितरणाचे आयोजन करेल ज्यामध्ये वंचित मुलांचा रॅम्प वॉक आणि ज्येष्ठ नागरिकांचे सांस्कृतिक कार्यक्रम यांचा समावेश असलेला फॅशन शो यांचाही समावेश आहे.

## पुणे - पंढरपूर महार्गावरील अपघातात चौघांचा जागीच मृत्यू

प्रतिनिधी
■ पुणे

पुणे- पंढरपूर मार्गावरील कारूंडे (ता.माळशिरस) येथे पुलावर झालेल्या कार व टेम्पोच्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला आहे. तर या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाले आहेत.हा अपघात रविवार सकाळी आठच्या सुमारास घडला. अपघाताची भीषणता एवढी होती की यामध्ये दोन्ही वाहनांचा चुराडा झाला.

याबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार , लासूर्णे (ता.इंदापूर) येथील राजेश शहा हे आपल्या कामगारांना घेऊन सातारा येथील कासपठार पाहण्यासाठी निघाले होते. ते नातेपुते येथून राँग साईडने निघाल्याने हा अपघात घडल्याचे सांगण्यात येत आहे. लासूर्णे येथून फक्त 20 किमी अंतरावर असणाऱ्या कारूंडे (ता. माळशिरस) येथील पुलावर सकाळी 8 वाजण्याच्या सुमारास या टेम्पोने कारला धडक दिल्याने हा भीषण अपघात घडला.

## प्लॅटफॉर्मवर झोपलेल्या प्रवाशांवर माथेफिरुचा हल्ला; 2 ठार, 3 गंभीर

प्रतिनिधी
■ नागपूर

नागपूर रेल्वे स्थानकावर हत्येचा थरार पाहायला मिळाला. एका व्यक्तीने चार जणांवर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यामध्ये गंभीर जखमी झालेल्या दोघांचा मृत्यू झाला तर दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. नागपूर रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक सातवर ही धक्कादायक घटना घडली. या घटनेमुळे खळबळ उडाली आहे. नागपूर लोहमार्ग पोलिस याप्रकरणाचा तपास करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर रेल्वे स्थानकावरील फलाट क्रमांक सातवर एका मनोरुग्ण व्यक्तीने चौघांवर हल्ला केला. आरोपी मनोरुग्ण या चौघांनाही मारत सुटला होता. रेल्वेच्या रुळात उपयोगात येणाऱ्या लाकडी राफटरने आरोपी त्यांच्यावर हल्ला करत होता. या हल्ल्यामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला तर दोघे गंभीर जखमी झाले रेल्वे पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना तात्काळ रुग्णालयात उपचारासाठी हालवले. जखमींची प्रकृती चिंताजनक आहे. गणेश कुमार डी (५४ वर्षे राहणार दिंडीगुल, तामिळनाडू) असे मृत प्रवाशाचे नाव आहे. तर दुसऱ्या मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. हल्ल्यानंतर आरोपीने घटनास्थळावरून पळ काढण्याचा प्रयत्न केला. पण रेल्वे कर्मचाऱ्यांनी रेल्वे रुळावर आरोपीचा पाठलाग करून त्याला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. जयराम रामअवतार केवट (३५ वर्षे) असे आरोपीचे नाव आहे. नागपूर पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E- TENDER 2nd CALL NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website https://srmetender.mahatransco.in/ for following works:

| Sr. No. | RFX No. | E-Tender No. & Description of Material | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender |
|---|---|---|---|
| 1 | 7000033631 | SE/EHV/O&M/CIR/KLW/TECH/ Ten-41(2nd Call)/24-25<br>E-Tender for work of providing Earth Pits to Transformer & Strengthening of Neutral Earthing by providing Additional Earthing (double) to Transformers at various S/S under EHV O&M Circle, Kalwa. | Tender Downloading Dates & time. Tender Sale period. From Dt: 08.10.2024, 00:00 Hrs. to Dt. 15.10.2024, 09:59 Hrs.<br>Technical Opening: - Dt. 15.10.2024 at 10: 00 Hrs (Onwards if possible)<br>Commercial Opening: - Dt.15.10.2024 at 15:00 Hrs. (Onwards if possible) |
| | | Tender Fee | Rs. 500 + GST |
| | | Estimated Cost | Rs. 99,13,540/- |

Contact Person Executive Engineer/ Dy. Exe. Engineer (O) Tel No. 9769006245 / 7506379055

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

### मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०११०१, दुरध्वनी क्र. : ८१९ २८२८.

**घनकचरा व्यवस्थापन विभाग**

**जा.क्र. मनपा/घ. व्य./५६०/२०२४-२५** — **दि. ७/ १० /२०२४**

**//अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest)//**

मिरा भाईंदर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत ऑफलाईन पध्दतीने Operation and Maintenance of Community Toilets at different places within the Mira Bhaindar Municipal areas करीता अनुभवी कंपनीकडून स्पर्धात्मक अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest ) मागविण्यात येत आहेत. ईच्छुक निविदाधारकांसाठी अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) माहितीसाठी 1 ला मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मिरा भाईंदर महानगरपालिका उपलब्ध आहे. अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) ऑफलाईन दि. 07/10/2024 ते दि. 15/10/2024 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील व अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) दि. 16/10/2024 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत उघडण्यात येईल.

सही/-
(डॉ. सचिन बांगर )
उपायुक्त (घ. व्य.) मिरा भाईंदर महानगरपालिका

जा.क्र. मनपा/मावज/30202028 /२०२३-24
दि. ०७/१०/२०२४

## रत्नागिरीत दोन किलो ब्राऊन हेरॉईन जप्त

**रत्नागिरी :** स्वत:जवळ ब्राऊन हेरॉईन बाळगलेल्या तरुणाला पोलिसांनी रंगेहाथ पकडले असून, त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मतिन महामुद शेख (३१, रा. ओसवालनगर रोड, उद्यमनगर, रत्नागिरी) असे त्याचे नाव आहे. त्याच्याकडून १०,८५० रुपयांचे २ किलो ब्राऊन हेरॉईन जप्त करण्यात आले आहे. ही कारवाई माळनाका - थिबा पॉईंट मार्गावरील एका महाविद्यालयाच्या गेटजवळ शुक्रवारी सायंकाळी करण्यात आली. याप्रकरणी रत्नागिरीतील स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलिस हेडकॉन्स्टेबल योगेश नार्वेकर यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार ते शुक्रवारी सायंकाळी ६:४० वाजण्याच्या दरम्यान माळनाका - थिबापॉईंट रस्त्याकडून राजेंद्रनगरकडे जात होते. त्यावेळी तेथील एका महाविद्यालयाच्या गेटजवळ रस्त्याशेजारी मतिन शेख उभा होता. हेडकॉन्स्टेबल नार्वेकर यांना संशय आल्याने त्यांनी त्याची झडती घेतली. त्यावेळी त्याच्याकडे प्लास्टिक पिशवीत एकूण ३१ पुड्या सापडल्या.

**पश्चिम रेल्वे**

**संकेत काम**

वरी. डीएसटीई/उत्तर/ मुंबई सेन्ट्रल, २ रा मजला, विभागिय रेल्वे व्यवस्थापक ह्यांचे कार्यालय, मुंबई सेन्ट्रल, मुंबई ४००००८ ई-निविदा क्र: एसजी_२१६_२_१०४_डब्ल्यूए_दि: ०४-१०-२०२४. काम आणि ठिकाण: पश्चिम रेल्वेच्या मुंबई विभागामधील उधना यार्ड रिमोल्डींग आणि उधना – सूरत ३ ऱ्या मार्गावर इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग (क्योसन बनावटीचे) मध्ये फेरफारासह संकेत काम आणि आउटडोअर काम. कामाचे अंदाजे मूल्य: रु. २,१६,५६,०७४.८६/- इरठे: रु. २,५८१,३००/-. ई-निविदा कागदपत्रे सादरीकरणासाठी शेवटचा दिनांक आणि वेळ : ३०.१०.२०२४ रोजी १५:०० वा. ई-निविदा उघडण्यासाठी दिनांक आणि वेळ : ३०.१०.२०२४ रोजी १५:३० वा. निविदा http://www.ireps.gov.in संकेतस्थळावर पाहता येईल. ०५९९

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

**पश्चिम रेल्वे**

**पुरवठा, बसविणे आणि कार्यान्वयन कामे**

वरी. डीएसटीई/उत्तर/ मुंबई सेन्ट्रल, २ रा मजला, विभागिय रेल्वे व्यवस्थापक ह्यांचे कार्यालय, मुंबई सेन्ट्रल, मुंबई ४००००८ ई-निविदा क्र: एसजी_१४१_१_६६_डब्ल्यूए_डीएफसीसीआयएल_ईआय_आर दि. ०४-१०-२०२४ मागवीत आहेत. काम आणि ठिकाण: मुंबई विभागामधील विरार – सुरत अनुभागादरम्यान विविध एलसी गेटसच्या संदर्भात आरओबीच्या डीएफसीसीआयएल बांधकामासह विविध एलसी गेटसमच्या रिटेन्शनकरीता ई. आय. सिस्टीमच्या फेरफार कामासंदर्भात पुरवठा, बसविणे आणि कार्यान्वयन करणे. कामाचे अंदाजे मूल्य: रु. १,१७,००,०००/- इरठे: रु. २,०८,५००/- ई-निविदा कागदपत्राच्या सादरीकरणासाठी समाप्तीकरीता दिनांक आणि वेळ: २५.१०.२०२४ रोजी १५:०० वा. ई-निविदा उघडण्यासाठी दिनांक आणि वेळ: २५.१०.२०२४ रोजी १५:३० वा. निविदा http://www.ireps.gov.in संकेतस्थळावर पाहता येईल. ०६००

आम्हाला लाईक करा : facebook.com/WesternRly

### उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कल्याण उपविभाग कल्याण यांचे कार्यालय

**भूमि संपादन, पुर्नवसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम २१ पोटकलम (१) व (२) अन्वये प्रसिद्ध करावयाचे**

**प्रकटपत्र**

**क्रमांक :- टे २/ भूसंपादन/ एल.ए.क्यू. एस. आर. क्र. २२३/२३** — **दि. ४/१०/२०१४**

याद्वारे जाहीररित्या प्रकट करण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिनीचे ९ मी. रुंद विकास नियोजन रस्ता या सार्वजनिक प्रयोजनासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे मार्फत भूसंपादन करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने भूसंपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ च्या कलम १९ च्या पोटकलम (२) अन्वये मौजे कल्याण, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे येथील भू.क्र./ग.क्र. ३३८१ व यांचे एकूण क्षेत्र ६५००० चौ.मी. ही अलीकडे चिन्हांकित केलेली व मोजलेली जमीन संपादनाबाबत अधिसूचना क्र -२ /भूसंपादन /कावि-१३५१/२३ दिनांक २६/ १० / २०२३ रोजी प्रसिद्ध केलेली आहे, तसेच नवाकाळ व नवशक्ती या मराठी दैनिक वृत्तपत्रात दिनांक २७/१०/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेली आहे.

तरी सदर जमिनीवर जर तुमचा कोणताही हितसंबंध असेल किंवा हितसंबंध असणा-या व्यक्तीसाठी काम चालविण्याचा तुम्हास हक्क असेल तर, तुम्हाला याव्दारे कळविण्यात येते की सदरहू परिशिष्टातील जमिनीवरील तुमच्या हितसंबंधाचे स्वरूप आणि त्या संबंधातोल तुमच्या नुकसान भरपाई संबंधीच्या दाव्याची रक्कम व तपशील, पुनर्वसन व पुनस्थापना संबंधातील दावे आणि उक्त कायद्यातील कलम १९ नुसार केलेल्या संयुक्त मोजणी संबंधाने तुमच्या काही हरकती असतील तर त्या स्वतः किवा अभीकर्त्यामार्फत निवेदन उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कल्याण उपविभाग ठाणे जिल्हा, मोहन प्राईड कल्याण केंद्र, दुसरा मजला, पोद्दार इंटरनॅशनल स्कूल जवळ, खडकपाडा, कल्याण (प.) ४२१३०१ यांच्या कार्यालयात दिनांक १४ / १० / २०२४ रोजी लेखी स्वरूपात दोन प्रतींमध्ये सादर कराव्यात.

**परिशिष्ट**
**संपादन करावयाच्या जमिनीचे वर्णन**
**गाव: - कल्याण तालुका:- कल्याण जिल्हा:- ठाणे**

| अ. क्र. | भूमापन किंवा गट क्रमाक | खरेदी / संपादन करावयाचे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|
| 1. | ३३८१ ब | ६५० |
| | एकूण | ६५०.०० |

**सार्वजनिक प्रयोजन :-** "कल्याण डोंबिवली महानगरपालिका विकास योजनेतील ९ मी. रुंद रस्त्याकरीता '

**क्र./केडी/भूसं/टे-२/कावि- ६६४ / २४**
**दि. ०४/१०/२०२४**

सही/-
(विश्वास गुजर)
उपविभागीय अधिकारी कल्याण
उपविभाग कल्याण

### बृहन्मुंबई महानगरपालिका

**जाहीर सूचना**

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण आणि प्रवर्तन नियमावली, २०३४ च्या नियम ३२ च्या अनुसार विकास अधिकार प्रमाणपत्राच्या स्वरूपात विकास हक्कांच्या हस्तांतरण (टी.डी.आर.) च्या संमतीसंदर्भात एम/ पश्चिम महापालिका प्रभागामधील विकास आराखडा २०३४ च्या मान्यतेच्या अनुसार महापालिका मार्केट सह व्हेंडिंग झोन + महापालिका स्टाफ क्वार्टर्स आणि १३.४० मो. रोडद्वारे बाधित होणाऱ्या ज्याचा तपशील खालील परिशिष्टामध्ये अधिक विस्ताराने देण्यात आलेल्या गाव वढवली मधील जमिनीचा धारण केलेला सर्वे क्र. ६५/१ त्यानंतरचा सुसंगत सी.टी.एस. क्र. ३१८ चे मालक श्री. किशोर मोहंदर अहुजा, श्री. विनोद मोहनदास अहुजा आणि श्री. लोकेश मोहनदास अहुजा ह्यांनी भारमुक्त असलेली जमीन बृमनपाला निशुल्क देण्यास तयारी दर्शवली आहे.

कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्ती (ज्याचा अर्थ व्यक्ती, संस्था, कंपन्या, व्यक्ती, वैधानिक संस्था/संस्था किंवा इतर कोणतेही प्राधिकरण इत्यादींचा समावेश आहे.) ज्यांच्या विरुद्ध कोणतीही माहिती असेल आणि/किंवा कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, स्वारस्य असेल, मालकी, विक्री, देवाणघेवाण, हस्तांतरण, भाडेपट्टा, सबलीज, गहाण, भेटवस्तू, भाडेकरू, रजा आणि परवाना याप्रमाणे, या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या जमिनीच्या संदर्भात दावा, मागणी किंवा आक्षेप लिखित किंवा तिचा कोणताही भाग, ट्रस्ट, वारसा, मृत्युपत्र, ताबा, देखभाल, गृहीतक, शुल्क, धारणाधिकार, सुलभता, खटला, वाद, कोणत्याही स्वरूपाचे किंवा अन्यथा किंवा कोणत्याही स्वरूपाचे इतर कोणतेही हक्क किंवा हितसंबंध आणि अर्जदाराचा डीआर वरील दावा कोणत्याही प्रकारचा न मिळाल्यावर अवलंबून आहे भूसंपादन कायदा, किंवा इतर कोणत्याही कायद्यांतर्गत किंवा वरीलप्रमाणे परस्पर संमतीने भरपाई आणि कोणाकडे त्याच्या विरुद्ध माहिती असल्यास, याद्वारे विधी अधिकारी, विधी विभागाच्या कार्यालयात खाली स्वाक्षरीदारांना महानगरपालिका मुख्य कार्यालय (ॲनेक्स बिल्डिंग), ३ रा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई :- ४०० ००१, अशा कोणत्याही कथित दाव्यासाठी/आक्षेपासाठी कागदोपत्री पुराव्यासह/ पुराव्यासह किंवा न्यायालयाच्या आदेशासह प्रकाशित झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कळवावे असे आवाहन करण्यात येत असून, असे जर न झाल्यास दावा किंवा मागणी मानली जाईल. सर्व हेतू आणि उद्देशांसाठी माफ केले गेले आहे असे समजण्यात येईल.

वर नमूद केल्याप्रमाणे टीडीआर च्या स्वरूपामध्ये विकास अधिकारांच्या हस्तांतरणाच्या संदर्भात कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, बृमनपा अनुदान टीडीआरची प्रक्रिया कोणताही संदर्भ न देता किंवा अशा कोणत्याही कथित दाव्याचा किंवा व्याजाचा संदर्भ न घेता स्वतःच्या गुणवत्तेनुसार पूर्ण करेल जे सर्व हेतू आणि हेतूंसाठी माफ केले गेले आहे असे मानले जाईल आणि ते बृमनपावर बंधनकारक असणार नाही.

**उपरोक्त संदर्भात परिशिष्ट**
**(टीडीआर/ईएस/एमडब्ल्यू ११०३)**

एम/[पश्चिम महानगरपालिका प्रभागाच्या संमत विकास आराखडा २०३४ च्या अनुसार ,महापालिका मार्केट सह व्हेंडिंग झोन + महापालिका स्टाफ क्वार्टर्स आणि १३.४० मी. रुंद डी. पी. रोडद्वारे बाधित होणाऱ्या नोंदणीकरण जिल्हा आणि मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यामधील गाव वढवली मधील साधारणपणे १७१४.०० चौ. मी. किंवा साधारणपणे तितक्याच असलेल्या रिक्त जमिनीचा किंवा मैदानाचा धारण केलेला सर्वे क्र. ६५/१ त्यानंतरचा सुसंगत सीटीएस क्र. ३१८ चा सर्व खंड किंवा भूखंड आणि त्याच्या सीमा पुढील प्रमाणे:

**पूर्वेस किंवा त्या दिशेने:** गाव वढवली मधील सीटीएस क्र. ३१९
**पश्चिमेस किंवा त्या दिशेने :** गाव वढवली मधील सीटीएस क्र. १३,१४,२५,९९ आणि ९
**दक्षिणेस किंवा त्या दिशेने :** गाव मरवली मधील सीटीएस क्र. ९०
**उत्तरेस किंवा त्या दिशेने :** गाव वढवली मधील सीटीएस क्र. ३२०

**७ ऑक्टोबर २०२४ रोजी दिनांकित**
पीआरओ/१५९२/जाही/२०२४-२५
स्वमर्जीने औषधोपचार करू नका.

सही/ -
(श्रीमती कोमल पंजाबी)
वकील आणि विधी अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका साठी



नितीन आणि भावना परुलकर यांच्या घरातील आई भवानीची मूर्ती



ताडदेवची अंबेमाता गोपाळ कृष्ण क्रीडा मंडळ, मुंबई सेंट्रल



गावदेवी सेवा युवा मित्र मंडळ ., उमेश नगर चौक., रेतीबंदर रोड ,देवीचा पाडा., डोंबिवली ( प )



नवदुर्गा प्रतिष्ठान कुलुपवाडी, बोरिवली ( पूर्व) येथील प्रति महालक्ष्मी अंबाबाई



दक्षिण मुंबईची आई माऊली- बाळ गोपाळ सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ, कामाठीपुरा ७वी गल्ली, ४८ वे वर्ष



धारावीची कुलस्वामिनी - खांबदेव उत्कर्ष सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ (रजि.)



नवसाला पावणारी सत्वाची माऊली म्हणून ख्याती असणारी सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ ( विठ्ठल विनायक सदन, शिवसेना शाखा २०६ परिसर) शिवडी )या मंडळाच्या देवीची मनोहरी मूर्ती.मंडळाचे यंदाचे ४४वे वर्ष आहे.



सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ अभुदय नगर इ. क्र. 35 ते 42 देवीची आकर्षक मूर्ती अध्यक्ष सूर्यकांत सावंत, सरचिटणीस जतिन गिरकर, खजिनदार मिलिंद जाधव, मूर्तिकार उदय खातू, सजावट चंद्रशेखर परब. वर्ष 47 वे.



कॉसमॉस को.ऑप. बँक लिमिटेड. दादर शाखा



नवरात्री मध्ये शक्तीची उपासना केली जाते . म्हणून तरुणांनाही एक मजबूत, सशक्त, बालदंड पिढी घडावी या भावनेने गिरगावमधील राऊत बिल्डिंग नवरात्री उत्सव मंडळ, मुगभाट लेन येथे काल रस्सीखेच स्पर्धा घेण्यात आली. विभागातील १२ संघांनी या स्पर्धेत भाग घेतला होता. नवरात्री मध्ये शक्तीची उपासना केली जाते मोबाईल मध्ये पार बुडून गेलेल्या तरुणाईला मैदानी खेळाच्या वळणावर आणणारी ही स्पर्धा बघण्यासाठी गिरगांवकरांनी प्रचंड गर्दी केली होती. शिवसेना दक्षिण मुंबई विभाग प्रमुख दिलीप नाईक यांच्या हस्ते मुगभाट लेन येथील विजेत्या संघास मानाचा करंडक देऊन गौरविण्यात आले.



चिंचपोकळी येथील पानसरे- शिंदे चाळ उत्सव मंडळ(रजि.) अंबाबाईची मूर्ती. यंदाचे मंडळाचे ८२ वे वर्ष आहे.



ईमा (इंडियन इलेक्ट्रिकल & इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन) च्या टीम मेंबर्सनी नवरात्राचा पांढरा रंग परिधान करून उत्सव साजरा केला.



शिवजयंती उत्सव समिती, वस्तू व सेवा कर भवन, माझगाव, मुंबई आयोजित नवरात्रीचे नवरंग या उपक्रमाअंतर्गत आजचा पाचवा दिवस - रंग पांढरा.

## अक्झोनोबेलतर्फे जगातील सर्वात उंचीवर असलेल्या व्हिलेजमध्ये लेट्स कलरचा उपक्रम

**वृत्तसंस्था**
**शिमला**

अक्झोनोबेल इंडियाने गुरुवार ३ ऑक्टोबर २०२४ रोजी हिमाचल प्रदेशातील तीन दुर्गम गावांत लेट्स कलर हा उपक्रम पूर्ण झाल्याचे जाहीर केले असून या उपक्रमाने रंगांची आमूलाग्र बदल घडवून आणण्याची ताकद अक्षरशः जगात कळसावर नेली आहे. काझाचे एडीसी आणि या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री. राहुल जैन यांनी भगवान बुद्धांच्या मूर्तीसमोर दीपप्रज्वलन करत या कार्यक्रमाचा शुभारंभ केला.

या कार्यक्रमासाठी कॉमिक आणि लांग्झा मॉनेस्ट्रीमधील लामा तसेच कॉमिक, हिक्कीम आणि लांग्झा येथील सुमारे १०० रहिवासी उपस्थित होते. हा अनोखा 'लेट्स कलर' प्रकल्प कॉमिक (जगातील सर्वाधिक उंचीवर असलेलं आणि मोटरेबल रस्ते म्हणजेच गाडीने जाण्यासारखे रस्ते असलेलं गाव), हिक्कीम (जगातील सर्वाधिक उंचीवर असलेलं पोस्ट ऑफिस) आणि लांग्झा (जिथे हिमालयापेक्षाही जुने जीवाश्म सापडले आहेत) या ठिकाणी आयोजित करण्यात आला होता. समुद्रसपाटीपासून १५,००० फुटांवर वसलेल्या (माउंट एव्हरेस्टच्या बेसइतक्या उंचीवर) या ठिकाणचे गावकरी बहुतांश तिबेटियन बुद्धीस्ट असून ते इथे नियमितपणे उणे २५ अंशांखाली जाणारं थंड तापमान सहन करत असतात. यामुळे दरवर्षी गाव नव्यानं रंगवण्याची गरज भासते. आता हे चित्र बदलले आहे, आमच्यासाठी हे 'लेट्स कलर' प्रकल्पापेक्षा जास्त मोठे आहे. हे पेंट्स हिमालयातील तीव्र हवामानापासून संरक्षण पुरवणारे व या प्रदेशातील शतकांपेक्षा प्राचीन बौद्ध अध्यात्मिक व सांस्कृतिक टॅपेस्ट्री जपणारे आहेत,' असे अक्झो नोबेल इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक राजीव राजगोपाल म्हणाले.

## केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांची आ. दरेकरांच्या रंगरास गरब्याला भेट

### भूमी त्रिवेदीच्या तालावर मुंबईकर थिरकले

**प्रतिनिधी**
**मुंबई**



देशभरात नवरात्रोत्सवाची धामधूम सध्या सुरु आहे. यानिमित्ताने ठिकठिकाणी दांडिया गरबा उत्सव साजरा केला जात आहे. बोरिवली पश्चिमेतील चिकुवाडी येथे भाजपा गटनेते आमदार प्रविण दरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड प्रतिष्ठानतर्फे रंगरास गरबा नवरात्री उत्सव आयोजित करण्यात आला आहे. या गरब्याला नुकतीच केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री खासदार पियुष गोयल यांनी सदिच्छा भेट दिली आणि गरबा रसिकांचा उत्साह वाढविला.

खा. पियुष गोयल यांनी उपस्थित गरबा रसिकांना हात उंचावून अभिवादन करत म्हटले की, लहानपणी मलाही गरबा खेळण्यात आवड होती. तुम्ही गरबा खेळण्याचा जो आनंद लूटताय त्यामध्ये मी येणार नाही. असेच आनंदाने खेळा, आई दुर्गा मातेचा आशीर्वाद तुम्हाला लाभो, सर्वांना नवरात्रीच्या शुभेच्छा. यावेळी बॉलिवूड अभिनेते जॅकी भगनानी यानेही रंगरास गरब्याला भेट दिली. प्रसिद्ध गायिका भूमी त्रिवेदी यांच्या गाण्याच्या तालावर मुंबईकर गरबा रसिक गरब्याचा मनमुराद आनंद लुटताना दिसले. याप्रसंगी मुंबई भाजपा उपाध्यक्ष प्रकाश दरेकर, रायगड प्रतिष्ठानचे पिनाकीन शहा, आदित्य दरेकर यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, बोरिवली चिकुवाडी येथील बाळासाहेब ठाकरे मैदानावर आ. प्रविण दरेकरांच्या मार्गदर्शनाखाली रायगड प्रतिष्ठान रंगरास गरबा नवरात्री उत्सवाचे यशस्वीपणे तिसरे वर्ष साजरे करत आहे.

## ना. आठवलेंनी अभिनेते गोविंदा यांची भेट घेऊन केली प्रकृतीची चौकशी



**मुंबई ।** रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी सोमवारी बॉलिवूडचे सुप्रसिद्ध सिनेअभिनेते गोविंदा यांची जुहू येथील त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली. गोविंदा यांना त्यांच्याच पिस्तुलमधून मिसफायर होऊन पायाला गोळी लागली होती. त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज दिल्यावर ते आता घरी विश्राम करीत आहेत. त्यांच्या प्रकृतीची ना.रामदास आठवले यांनी भेट घेऊन चौकशी केली. ना.रामदास आठवले यांच्याशी अपले जिव्हाळ्याचे सबंध असून त्यांचा अशीर्वाद कायम माझ्या पाठीशी असून आज माझी भेट घेतल्याबद्दल मी खूप समाधानी झाल्याचे सुपरस्टार गोविंदा यांनी सांगितले.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राजेश गाडे, सुनील पवार आदी मान्यवर उपस्थित होते.


वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!




अशोक गर्ग
मुंबई काँग्रेसचे
महासचिव

# सिद्धार्थ दवंडे अव्वल; शालेय स्पर्धेत जीवन, अब्बास, नीम, यत्न , जुई विजयी

**मुंबई :** मुंबई शहर हौशी सायकलिंग संघटना आणि मुंबई जिल्हा क्रीडाधिकारी आयोजित सायकलिंग स्पर्धेत खुल्या गटात सिद्धार्थ दवंडे शालेय गटात जीवन,अब्बास, नीम, यत्न आणि जुई आपलपल्या गटात विजयी ठरले. वांद्रे कुर्ला संकुलात पार पडलेल्या मुंबई जिल्हा अजिंक्यपदाच्या २० किलोमीटर अंतराच्या रंगतदार शर्यतीत सिद्धार्थ दवंडेने प्रजीन नाडरला अवघ्या चार दशांश सेकंदाने मागे टाकत अजिंक्यपद आपल्या खिशात टाकले. सिद्धार्थने शर्यत जिंकताना २३:१६:३ मिनिटे अशा कामगिरीसह बाजी मारली. तर २३:२०:४० मिनिटे अशी वेळ नोंदवणाऱ्या प्रजीनला दुसऱ्या स्थावर समाधान मानावे लागले. निशांत कोयंडेने २४:४२:३९ मिनिटे अशी वेळ नोंदवत तिसरा क्रमांक मिळवला.आंतरशालेय स्पर्धेत १४ वर्षे मुलांच्या गटात जीवन मार्लेशाने २ किलोमीटर अंतराची शर्यत ५:१६:१९ मिनिटात पूर्ण करत वर्चस्व राखले. मुलांच्या १७ वर्षे गटात यत्न राठोडने ६ किलोमीटर अंतराच्या शर्यतीत बाजी मारताना १० :५६ मिनिटे अशी वेळ नोंदवली. या गटातील मुलींच्या ६ किलोमीटर अंतराच्या शर्यतीत नीम शेखने १०;४५;७१ मिनिटे अशी वेळ नोंदवली. १९ वर्षे मुलांमध्ये ८ किलोमीटरचे अंतर अब्बास हार्नेसवालाने १२:०६:४१ मिनिटात पार करत पहिला क्रमांक मिळवला. मुलींमध्ये ६ किलोमीटरचे अंतर जुई नारकरने ६: ३४;२० मिनिटात पूर्ण करत विजय मिळवला.



# बेस्टच्या भाडे तत्वावरील बसेसवरील कंत्राटी कामगारांचा गुरुवारी मोर्चा

प्रतिनिधी
■ मुंबई

बेस्ट उपक्रमातएस.एम.टी.ए.टी. पी.एल. (डागा ग्रुप), बी. व्ही. जी. इंडिया लिमीटेड, हंसा सिटी बस सर्व्हिसेस (मुंबई) प्रा. लि. आणि मातेश्वरी अर्बन ट्रान्सपोर्ट लिमिटेड यांच्या मार्फत बेस्ट ची सेवा देणाऱ्या कामगारांच्या विविध मागण्यांकडे बेस्ट प्रशासन, मुंबई

### शशांक राव करणार नेतृत्व

महानगरपालिका आणि महाराष्ट्र राज्य सरकार यांचे लक्ष वेधण्यासाठी संघर्ष कामगार कर्मचारी युनियनच्या वतीने कामगार नेते शशांक राव. यांच्या नेतृत्वाखाली गुरूवारी १० ऑक्टोंबर २०२४ रोजी दुपारी ३ वाजता वडाळा आगारावर मोर्चा नेण्यात येणार आहे.

**प्रमुख मागण्या**

*१) भाडेतत्वावर पुरविलेल्या बसगाड्यांवर कार्यरत असलेल्या बसचालक, वाहक व इतर कामगारांना ते सेवेत लागल्या पासून बेस्ट उपक्रमाचे कायम कामगार म्हणून समाविष्ट करण्यात यावे.२) या कामगारांना जोपर्यंत बेस्ट उपक्रमात कायम कामगार म्हणून समाविष्ट केले जात नाही तो पर्यंत "समान कामाला, समान दाम" या तत्वानुसार बेस्ट उपक्रमामधील समकक्ष, कायम व नियमीत कामगाराला लागू असलेले वेतनमान व इतर सेवा सवलती तातडीने लागू करण्यात याव्यात.३) या कामगारांना २०२३-२४ साठी बेस्ट उपक्रमातील कर्मचाऱ्यांना देण्यात येणारा बोनस / सानुग्रह अनुदानाच्या रक्कमेपेक्षा कमी असणार नाही, इतकी रक्कम दिवाळीसणापूर्वी बोनस / सानुग्रह अनुदान म्हणून प्रदान करण्यात यावी.४) एस.एम.टी.ए.टी.पी.एल. (डागा ग्रुप), बी.व्ही. जी. इंडिया लिमीटेड, हंसा सिटी बस सर्व्हिसेस (मुंबई) प्रा. लि. आणि मातेश्वरी अर्बन ट्रान्सपोर्ट लिमिटेड यांच्याकडून दैनंदिन कामकाजामध्ये केल्या जाणाऱ्या अनुचित कामगार प्रथा (Unfair Labour Practice) तातडीने बंद करण्यात याव्यात.*

# महाराष्ट्राच्या गोविंदांनी स्पेनमध्ये फडकावला तिरंगा

### 'कॉनकुर इंटरनॅशनल्स २०२४' स्पर्धेत मारली बाजी

प्रतिनिधी
■ माद्रिद

महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला गोविदांनी स्पेनमधील 'डेल पेनडेस विला फ्रांका' येथे प्रसिद्ध 'कॉनकुर फेस्टिवल'ला भेट दिली.या भेटीत त्यांनी 'कॉनकुर फेस्टिवल'मध्ये आकर्षक मनोरे (थर) रचण्याचे आपले कौशल्य दाखवत स्पेनवासीयांची माने जिंकली आणि तेथील स्थानिक स्पर्धेत पारितोषिक पटकावत देशाचा तिरंगा मोठ्या अभिमानाने फडकावला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली आणि आमदार प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली प्रो गोविंदा लीगचे अध्यक्ष पुर्वेश सरनाईक यांनी या गोविंदा पथकाच्या स्पेन दौऱ्याचे आयोजन केले होते.



महाराष्ट्रातील गोविंदांचा संघ स्पेनमध्ये 'कॉनकुर इंटरनॅशनल्स २०२४' स्पर्धेत विजयी झाला. ही स्पर्धा मानवी मनोरे बांधण्याच्या कलेतील प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय स्पर्धांपैकी एक आहे.पुर्वेश सरनाईक आणि महाराष्ट्रातील शिष्टमंडळाने स्पेनमधील 'डेल पेनडेस विला फ्रांका' येथे प्रसिद्ध 'कॉनकुर फेस्टिवल'ला भेट दिली. हा सण मुंबई आणि ठाण्यात साजऱ्या होणाऱ्या दहीहंडी उत्सवाशी सांस्कृतिकदृष्ट्या संबंधित आहे आणि यामध्ये मानवी मनोरे सादर करण्यात येतात.

महाराष्ट्राच्या संघाला 'कॅस्टेलर्स विला फ्रांका' या जगातील सर्वात यशस्वी मानवी मनोरे बांधणाऱ्या संघासोबत सहयोग करण्याची संधी मिळाली. या कार्यक्रमात दोन्ही संघांनी एकत्रित मनोरे बांधण्याचा सराव केला व एकमेकांच्या मानवी मनोरे उभारणाच्या कौशल्याचे आदान-प्रदान केले. या भेटीत विला फ्रांका शहराचे महापौर यांनी पुर्वेश सरनाईक आणि भारतीय शिष्टमंडळाचे सन्माननीय पाहुणे म्हणून स्वागत केले.

या दौऱ्याचे मुख्य आकर्षण होते 'कॉनकुर इंटरनॅशनल्स २०२४' स्पर्धेत भारताच्या संघाचा भव्य विजय, ज्यामध्ये स्वित्झर्लंड, डेन्मार्क, फ्रान्स, नॉर्वे आणि अँडोरा यांसारख्या विविध देशांतील १२ संघांचा समावेश होता. या विजयामुळे महाराष्ट्र आणि भारताचे नाव जागतिक पातळीवर गाजले. या संपूर्ण दौऱ्याचे आयोजन आणि व्यवस्थापन महाराष्ट्र राज्य दहीहंडी संघटनेचे अध्यक्ष सुरेंद्र पांचाळ, अभिषेक सुर्व आणि गीता झगडे यांच्या नेतृत्वाखाली उत्तमरीत्या पार पडले. त्यांच्या अथ्थक प्रयत्नांमुळे भारताचे आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सशक्त प्रतिनिधित्व करण्यास यश मिळाले. दोन्ही राष्ट्रांतील सांस्कृतिक बंध दृढ झाले आणि महाराष्ट्राच्या गोविंदांनी जागतिक स्तरावर एकता, सामर्थ्य, आणि जिद्दीचे प्रदर्शन केले.

पुर्वेश सरनाईक आणि भारतीय संघाने 'कॅस्टेलर्स विला फ्रांका' संघाचे अध्यक्ष अर्नेस्ट गॅलर्ट, माजी अध्यक्ष मिकेल फेरट आणि माजी संघ कर्णधार टोनी बाख यांचे आभार मानले. या सहयोगामुळे भारत आणि स्पेन यांच्यातील सांस्कृतिक संबंध अधिक दृढ झाले असून, मानवी मनोरे बांधण्याच्या या कलेचे तांत्रिकदृष्ट्या आदान-प्रदान करण्यास फायदा होईल, असा विश्वास सरनाईक यांनी व्यक्त केला.

### माझी माऊली चषक कॅरम स्पर्धा

# समीर, मयांक, स्वस्तिक उपांत्यपूर्व फेरीत



प्रतिनिधी
■ मुंबई

सार्वजनिक नवरात्र महोत्सव मंडळ-जेजे व आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित आंतर शालेय १६ वर्षाखालील मुलांच्या विनाशुल्क कॅरम स्पर्धेत बाबासाहेब आंबेडकर हायस्कूल-वरळीचा समीर खान, जेकब ससून हायस्कूल-नागपाडाचा मयांक सोळंकी, सेंट जोसेफ हायस्कूल-डोंगरीचा स्वस्तिक सुर्वे, डॉ. शिरोडकर हायस्कूल-परेलचा वेदांत हळदणकर आदींनी उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

समीर खानने प्रतिकूल स्थितीमधील पहिला बोर्ड राणीसह ४-० अशा आघाडीने घेतल्यामुळे पाटकर विद्यालयाच्या गौरांग मांजरेकरचे टेन्शन वाढले. त्याचा लाभ उठवत समीर खानने १८-० असा सहज विजय मिळवीत तिसरी फेरी जिंकली.

जे.जे. हॉस्पिटल कंपाऊंड-भायखळा येथे सुरु झालेल्या कॅरम स्पर्धेत मयांक सोळंकी विरुध्द जितेंद्र जाधव यामधील तिसऱ्या फेरीची लढत अटीतटीमध्ये रंगली. प्रारंभी ६-० अशी आघाडी घेणाऱ्या जितेंद्र जाधवचे आव्हान मयांक सोळंकीने ९-६ असे संपुष्टात आणून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. अन्य सामन्यात वेदांत हळदणकरने दुर्वांक शेलारचा १५-३ असा, स्वस्तिक सुर्वेने सर्वेश परुळेकरचा १०-२ असा तर आयुष पालकरने आदेश महाडिकचा ७-३ असा पराभव करून तिसऱ्या फेरीत विजय संपादन केला.

स्पर्धेमध्ये मुंबई शहर व उपनगर, ठाणे, पालघर, रायगड आदी जिल्ह्यामधील शालेय-कॉलेज ६४ खेळाडू सहभागी झाले आहेत. २४ व्या शालेय कॅरम स्पर्धेचे सातत्य राखत मंडळाने सबज्युनियर कॅरमपटूना प्रोत्साहन देण्यासाठी चँम्पियन कॅरम बोर्डावर दर्जेदार स्पर्धेचे पूर्णपणे मोफत आयोजन केले आहे.

# जागतिक रक्तदान दिनानिमित्त रक्तदान शिबिरांचा शतकोत्तर रौप्य सोहळा

प्रतिनिधी
■ मुंबई

महाराष्ट्र राज्याच्या सेवेत शासकीय कर्मचारी कार्यरत असताना आपण महाराष्ट्र शासनाचे देणे आहोत या भावनेतून सेवा निवृत्तीनंतरही रक्तदानाच्या कार्यात अविरत कार्यरत राहून आपल्या मासिक वेतनातून प्रयोगशाळा आणि रक्तपेढी तंत्रज्ञ धर देवलकर व परिचारिका सौ स्वाती देवलकर यांनी रक्तदान शिबिरांचे शतकपुर्ती सोहळा साजरा केला.या सोहळ्यानिमित्त स्वेच्छा रक्तदाते,रक्तपेढी अधिकारी, तंत्रज्ञ, समाज विकास अधिकारी,यांचा सन्मानपत्र देऊन गौरव सोहळा संपन्न झाला.



कामगार राज्य विमा योजना रुग्णालय कांदिवली पूर्व येथील रुग्णालयातील सेवा निवृत्त सहाय्यक तंत्रज्ञ धर बुधाजी देवलकर जे आपली शासकीय सेवा सांभाळून गेली तीस वर्षे रक्तदान सहाय्य केंद्र या संस्थे द्वारे रक्तदान शबिरांचे आयोजित करून शासकीय नियमानुसार रुग्णांना विनामूल्य रक्तकुपिंचा पुरवठा करीत आहे. या तीस वर्षात आपली शासकीय सेवा सांभाळून त्यांनी १२५ रक्तदान शिबिरे आयोजित केली आहेत. जागतिक रक्तदान दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिरांचे शतकपूर्ती सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या पवित्र सोहळयास आवर्जून उपस्थित असलेले राज्य रक्त संक्रमण परिषद महाराष्ट्र राज्याचे मा.सहाय्यक संचालक डॉ.संजय जाधव यांनी दीप प्रज्वलीत करून सोहळ्याचे उद्घाटन केले प्रथमच रक्तदान कार्यक्रमात संगीताचा नजराणा पेश करून रक्तदाते यांचा सन्मान करताना देवलकर यांनी आपल्या काव्य स्वरूपात सन्मानपत्र बहाल केले.

रक्तदान शिबिरांचा शतकपूर्ती सोहळा बोरिवली पूर्व येथील सहकार भवन सभागृह स्व.मोहन वाघ फुलपाखरू उद्यान या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या पवित्र सोहळयास सुनील जाधव, लक्ष्मण शेडगे,सत्यवान राणे,रमेश मोरे यांनी मोलाचे सहकार्य केले तसेच सभागृहाचे प्रमुख आणि रक्तदाते भरत घाणेकर आणि समाजसेवक कृणाल अशोक भट यांचे ही या पवित्र सोहळ्यास योगदान लाभले. देवलकर यांनी सर्व रक्तदाते आणि उपस्थितांचे आभार मानले.



*__मुंबई :__ महाराष्ट्र श्रमिक सभेच्या माध्यमातून रविवारी दादर येथे कंत्राटी कामगारांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी काँग्रेसचे नेते आणि माजी खासदार हुसेन दलवाई यांचे स्वागत करताना संघटनेचे अध्यक्ष प्रभाकर नारकर, तसेच डावीकडे संघटनेचे सरचिटणीस केतन कदम, ज्येष्ठ कामगार नेते सूर्यकांत बागल तसेच ईशान्य मुंबई जनता दलाचे अध्यक्ष संजीवकुमार सदानंद. सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांना निवेदन देऊन कंत्राटी कामगारांच्या प्रश्नावर भूमिका स्पष्ट करण्याची मागणी करण्याचा निर्णय या मेळाव्यात घेण्यात आला.*

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा; भाजप मुंबईत 100 ठिकाणी जल्लोष करणार

■ मुंबई

मराठी भाषेला अभिजात भाषेच्या दर्जा दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी, राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचे आभार मानले.भाजपातर्फे मुंबईत 100 ठिकाणी चौका चौकात याचा आनंद उत्सव साजरा केला जाणार आहे मराठी गाणी वाजवून मराठी साहित्यिकांचे अभिनंदन करून तसेच काही ठिकाणी दिंडी, ग्रंथ प्रदर्शन अशा विविध मार्गातून हा आनंदोत्सव साजरा केला जाणार आहे. ज्यावेळी मराठी भाषेला अभिजात भाषा देण्याबाबतची कमिटी गठीत झाली तेव्हा काँग्रेसचे सरकार होते, तेव्हा उबाठा सेना त्यांच्यासोबत नव्हती, आज निर्णय झाला तेव्हा या निर्णय प्रक्रियेमध्ये आणि सरकारमध्ये उबाठा नाही. त्यामुळे याचे श्रेय लाटू नये, याबाबत श्रेय घेणारे संजय राऊत आता नागडे झाले आहेत, अशी खरमारी टीका आमदार अँड आशिष शेलार यांनी केली भारतातील सर्व 450 विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणं,प्राचीन ग्रंथ अनुवादित करणं,महाराष्ट्रातील सर्व 12,000 ग्रंथालयांना सशक्त करणं, मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती, विद्यार्थी अशा साऱ्यांना भरीव मदत करणं शक्य होणार आहे.


## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ
(म्हाडाचा विभागीय घटक)

म्हाडा MHADA

संदर्भ :- का.अ./ सी-१ / मुं. ई. दु. पू. मंडळ / ई. नि. सू.क्र.०७/२०२४ (Recali)

### निविदा सुचना

कार्यकारी अभियंता, सी-१ विभाग, मुं. इ. दु. व पु. मंडळ, ए-६६, दादरकर कंपाऊंड, ताडदेव, मुंबई-३४ यांच्या कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्ती कामाकरीता म्हाडा / मुं.म.पा./ सा.बां. विभाग / के.सा.बां.वि. / रेल्वे/ बीपीटी, अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यावेकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र कंत्राटदाराकडून खालील कामाच्या मोहरबंद बी-१ (टक्केवारी दर) निविदा मागविण्यांत येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव व तपशील | निविदा रक्कम ₹ | इसारा रक्कम ₹ [१%] | सुरक्षा अनागत [२% ] ( ५०% रक्कम सुरुवातील व नंतर व ५०% रक्कम देयकांतूतन) ₹ | कोऱ्या निविदेची रक्कम + G.S. T. (विना परतावा) ₹ | कोऱ्या निविदा विक्रीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा स्वीकृतीची तारीख व वेळ | मोहरबंद निविदा उघडण्याची तारीख व वेळ | काम करावयाचा कालावधी | ठेकेदारांची नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | इमारत क्र १३-२९-३१ जिवनजी महाराज लेन (मंडळ निधी) | ₹ ९,९५,२१७ | ₹ ९.९५२/- | ₹१९,९०४/- (₹९,९५२/- प्रथम व नंतर ₹ ९,९५२/- देवकातून) | ₹५९०/- | दि. ०९.१०.२०२४ स.११.०० पासून दि १८.१०.२०२४ दुपारी ०२.०० वाजेपर्यंत | दि. २१.१०.२०२४ स. ११:०० पासून ते २२.१०.२०२४ दुपारी ०४.०० वाजेपर्यंत | दि. २३.१०.२०२४ सकाळी ११.०० वाजल्यापासून, शक्यझाल्यास | १२ महिने (पावसाळ्या सहित) | वर्ग ७ व त्यावरील |
| २ | इमारत क्र २०३ - २०५ शेख मेमन स्ट्रीट (मंडळ निधी) | ₹९,९१,१८० | ₹ ९,९५२/- | ₹१९,९०४/- ( ₹९.९५२ / - प्रथम व नंतर ₹९,९५२/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ३ | ५८-६० सुतार चाळ (मंडळ निधी) | ₹७,९७,०१९ | ₹७,९७०/- | ₹ १९,८२४/- (₹९,९१२/- प्रथम व नंतर र ९,९१२/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ४ | ३५ मारुती लेन (मंडळ निधी) | ₹७,१६,४१४/- | ₹७,१६४/- | ₹ १५.९४०/- (₹ ७,९७० /- प्रथम व नंतर ₹७,९७०/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ५ | ४० बापू खोटे स्ट्रीट मंडळ निधी | ₹५,६६,४४१ | ५,६६४/- | ₹.११,३२८/-( ₹५,६६४/- प्रथम व नंतर ₹५,६६४/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ६ | ८४ अली उमर स्ट्रीट ( मंडळ निधी) | ₹४,१९,७१८ | ₹ ४,१९७/- | ₹ ८,३९४/- ( २४, १९७ / - प्रथम व नंतर ₹४,१९७/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | वर्ग ८ व त्यावरील |
| ७ | ७१ निझाम स्ट्रीट ( मंडळ निधी) | ₹४, १६, १९१ | ₹४,१६२/- | ₹८,३२४/- ( १४,१६२/- प्रथम व नंतर र ४,१६२/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ८ | २४८-२५० इब्राहिम रहमतुल्ला रोड (विसस निधी ) | ₹३,८५,३३६ | ₹ ३,८५३/- | ₹७,७०६/- (₹ ३. ८५३/- प्रथम व नंतर ₹३,८५३/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| ९ | इमारत क्र १२१-१२३ मस्जिद स्ट्रीट (मंडळ निधी) | ₹३,३०,१५५ | ₹ ३,३०१/- | ₹६,६०३/- (₹३,३००/- प्रथम व नंतर ₹३,३०१/- देयकातून ) | ₹५९०/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | --//-- |
| १० | इमारत क्र ६५ निजाम स्ट्रीट आमदार,( वि स स निधी ) | ₹२,२८,९४० | ₹ २,२८९/- | ₹४,५७८/-₹ २,२८९/- प्रथम व नंतर ₹२,२८९/- देयकातून ) | ₹२३६/- | --//-- | --//-- | --//-- | --//-- | वर्ग ९ व त्यावरील |

१.कोऱ्या निविदा म्हाडा / भुं म.पा. / सा.बां. विभाग / के. सा.बादि / रेल्वे / बीपीटी अथवा कोणतेही सरकारी किंवा निमसरकारी विभाग यांच्याकडे योग्य त्या वर्गाच्या नोंदणीकृत व पात्र वर्गाच असलेल्या नोंदणी प्रमाणपत्राच्या पॅन कार्ड व पूर्वी अशा प्रकारची कामे केलेले पुर्वानुभवाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतरच मिळू शकतील.
२. म्हाडाकडे नोंदणीकृत नसलेल्या ठेकेदारानी निविदा भरताना ते कुठल्याही सरकारी / निमसरकारी संस्थेमध्ये काळ्या यादीत नाव समाविष्ठ नसल्याचे नोटरी पुढील यंत्र सादर करावे.
३. निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोटरी केलेले सादर करावे.
४ इसारा रक्कम फक्त राष्ट्रीयकृत / शेडयुल बँकेच्या १ वर्षाच्या अल्प मुदतीची अनामत राशी मुख्य लेखाधिकारी, मु. इ. दु. व पु. मंडळ यांच्या नांवावर द्यावी.
५.संयुक्त बोली दाराची बोली स्विकारली जाणार नाही.
६. जर निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा कमी दराचा असेल तर प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्यांनी अतिरिक्त सुरक्षा अनामत रक्कम निविदा उघडल्याच्या दिसून दिवसाच्या आत भरली नाही तर द्वितीय न्यूनतम देकाराच्या निविदाधारकास लेखी विचारणा करण्यात येईल व द्वितीय न्यूनतम निविदाकार करण्यास तयार असेल तर त्याची निविदा मंजूर करण्यात येईल. अतिरिक्त सुरक्षा रक्कमेचा सविस्तर निविदा सुचना पहावी.
७. कोऱ्या निविदाच्या प्रती कार्यकारी अभियंता सी-१ विभाग, मुं. इ. सु. व पु. मंडल, ए -६६ दादरकर कंपाऊंड ताडदेव मुंबई-३४, यांचेकडून क्र. ७ मध्ये विहीत केलेल्या दिनांक व वेळेप्रमाणे निविदायी विक्री केली जाईल व सिलबंद निविदा याच कार्यालयात रकाना क्र. ८ प्रमाणे स्विकृती केली जाईल व मोहरबंद निविया शक्य झाल्यास दि. २३.१०.२०२४ रोजी सकाळी ११.००वाजल्यापासून कार्यकारी अभियंता सी-१ विभाग, मु. इ. दु. व. मंडल, यांच्या कार्यालयात उघडण्यात येईल.
८. एक किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय फेटाळण्यांचे अधिकार सक्षम अधिकाऱ्याकडे ठेवण्यात येत आहे.
९. निविदा स्विकृती दिनाच्या शेवटच्या दिवसापासून ३ महिने किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीपर्यंत कंत्राटदाराचे नोदणी प्रमाणपत्र ग्राहकले सहेजे अन्यथा त्या दारा विचार केल जाणार नाही.
१०. भाडेकरु / रहिवाशी यानी ना हरकत प्रमाणपत्राद्वारे संरचनात्मक दुरुस्तीसाठी किंवा पुनर्विकासाठी प्रस्ताव दाखल केल्यास, ठेकेदारास जरी स्वीकार / कार्यादेश देण्यात आले असतील व कुठल्याही नुकसानीबद्दल हक्क किंरा दावा ग्राह्य धरण्यात येणार नाही.
११. जीएसटी अंतर्गत नोदणी प्रमाणपत्र अनिवार्य आहे.
१२. निविदा सूचनेमध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार तसेच निविदा सादर करावयाच्या कार्यपध्दतीनुसार लखोटा बंद निविदा सादर कराव्यात.

सही/-
(राजेश शिंदे)
कार्यकारी अभियंता, सी-१ विभाग
मु. इ. दु. व पु. मंडळ, म्हाडा, मुंबई

CPRO/A/914
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था
Follow us: @mhadaofficial



## बृहन्मुंबई महानगरपालिका

### जाहीर सूचना

सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की बृहन्मुंबई महानगरपालिका विकास नियंत्रण आणि प्रवर्तन नियमावली, २०३४ च्या नियम ३२ च्या अनुसार विकास अधिकार प्रमाणपत्राच्या (डीआरसी) स्वरूपात विकास हक्कांच्या हस्तांतरण (टी.डी.आर.) च्या संमतीसंदर्भात आर/ उत्तर महापालिका प्रभागामधील विकास आराखडा २०३४ च्या मान्यतेच्या अनुसार डी. पी. रोड आणि सध्याच्या रस्त्याद्वारे बाधित होणाऱ्या ज्याचा तपशील खालील परिशिष्टामध्ये अधिक विस्ताराने देण्यात आलेल्या गाव दहिसर मधील जमिनीचा धारण केलेला सी.टी.एस. क्र. ३०९२ ए/ २ (भाग) चे मालक (१) श्री. जयवंत पी. तरे (२) श्री. सुरेंद्र पी. तरे (३) श्री किशोर पी. तरे, (४) श्री. नरेंद्र पी. तरे, (५) श्रीमती उर्मिला पांडुरंग वैद्य, (६) श्रीमती अलका रमेश वैती आणि (७) श्रीमती पुष्पा मनोहर कोळी ह्यांचे कायदेशीर वकील असलेल्या मे. फल्सा कस्ट्रक्शन, एकमेव प्रोप्रायटर असलेले श्री. प्रकाश टी. तन्ना ह्यांनी भारमुक्त असलेली जमीन बृमनपाला निशुल्क देण्यास तयारी दर्शवली आहे.

कोणतीही व्यक्ती किंवा व्यक्ती (ज्याचा अर्थ व्यक्ती, संस्था, कंपन्या, व्यक्ती, वैधानिक संस्था/संस्था किंवा इतर कोणतेही प्राधिकरण इत्यादींचा समावेश आहे.) ज्यांच्या विरुद्ध कोणतीही माहिती असेल आणि/किंवा कोणताही हिस्सा, हक्क, शीर्षक, स्वारस्य असेल, मालकी, विक्री, देवाणघेवाण, हस्तांतरण, भाडेपट्टा, सबलीज, गहाण, भेटवस्तू, भाडेकरू, रजा आणि परवाना याप्रमाणे, या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या जमिनीच्या संदर्भात दावा, मागणी किंवा आक्षेप लिखित किंवा तिचा कोणताही भाग, ट्रस्ट, वारसा, मृत्युपत्र, ताबा, देखभाल, गृहीतक, शुल्क, धारणाधिकार, सुलभता, खटला, वाद, कोणत्याही स्वरूपाचे किंवा अन्यथा किंवा कोणत्याही स्वरूपाचे इतर कोणतेही हक्क किंवा हितसंबंध आणि अर्जदाराचा डीआर वरील दावा कोणत्याही प्रकारचा न मिळाल्यावर अवलंबून आहे भूसंपादन कायदा, किंवा इतर कोणत्याही कायद्यांतर्गत किंवा वरीलप्रमाणे परस्पर संमतीने भरपाई आणि कोणाकडे त्याच्या विरुद्ध माहिती असल्यास, याद्वारे विधी अधिकारी, विधी विभागाच्या कार्यालयात खाली स्वाक्षरीदारांना महानगरपालिका मुख्य कार्यालय (ॲनेक्स बिल्डिंग), ३ रा मजला, महापालिका मार्ग, फोर्ट, मुंबई :- ४०० ००१, अशा कोणत्याही कथित दाव्यासाठी/ आक्षेपासाठी कागदोपत्री पुराव्यासह/ पुराव्यासह किंवा न्यायालयाच्या आदेशासह प्रकाशित झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत लेखी कळवावे असे आवाहन करण्यात येत असून, असे जर न झाल्यास दावा किंवा मागणी मानली जाईल. सर्व हेतू आणि उद्देशांसाठी माफ केले गेले आहे असे समजण्यात येईल.

वर नमूद केल्याप्रमाणे टीडीआर च्या स्वरूपामध्ये विकास अधिकारांच्या हस्तांतरणाच्या संदर्भात कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, बृमनपा अनुदान टीडीआरची प्रक्रिया कोणताही संदर्भ न देता किंवा अशा कोणत्याही कथित दाव्याचा किंवा व्याजाचा संदर्भ न घेता स्वतःच्या गुणवत्तेनुसार पूर्ण करेल जे सर्व हेतू आणि हेतूंसाठी माफ केले गेले आहे असे मानले जाईल आणि ते बृमनपावर बंधनकारक असणार नाही.

**उपरोक्त संदर्भात परिशिष्ट**
**(टीडीआर/डब्ल्यूएसII/आरएन १००५)**

आर/ उत्तर महानगरपालिका प्रभागाच्या संमत विकास आराखडा २०३४ च्या अनुसार डी.पी. रोड आणि सध्याच्या रोडद्वारे बाधित होणाऱ्या नोंदणीकरण जिल्हा आणि मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्ह्यामधील गाव दहिसर मधील साधारणपणे १३१३.२२ चौ. मी. किंवा साधारणपणे तितक्याच असलेल्या रिक्त जमिनीचा किंवा मैदानाचा ध्रारण केलेला सीटीएस क्र. ३०९२/ए/२ (पार्ट) चा सर्व खंड किंवा भूखंड आणि त्याच्या सीमा पुढील प्रमाणे:

**पूर्वेस किंवा त्या दिशेने:** गाव दहिसरमधील सीटीएस क्र. ३०९२/ए/१
**पश्चिमेस किंवा त्या दिशेने :** पश्चिम द्रुतगती महामार्ग
**दक्षिणेस किंवा त्या दिशेने :** मधुबन रोड, गाव दहिसरमधील सीटीएस क्र. ३०८९ ए३/१
**उत्तरेस किंवा त्या दिशेने :** गाव दहिसरमधील सीटीएस क्र. ३११३ डी वरील सध्याचा रोड

**७ ऑक्टोबर २०२४ रोजी दिनांकित**
पीआरओ/१५९१/जाही/२०२४-२५
स्वमर्जीने औषधोपचार करू नका.

सही/ -
(श्रीमती कोमल पंजाबी)
वकील आणि विधी अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका साठी

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन



नरेंद्र मोदी
पंतप्रधान

# २४ महिने, ४२ निर्णय

## संकल्प निरोगी महाराष्ट्राचा



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री



सार्वजनिक आरोग्य विभागाची विश्वविक्रमी कामगिरी!

**पालखी मार्ग आणि पंढरपूर महाआरोग्य शिबिरात १५,१२,७७४ वारकऱ्यांना मोफत आरोग्य सेवा पुरविण्यात आली**

पंढरपूर महाआरोग्य शिबिराची सलग दुसऱ्यांदा व परांडा येथील महाआरोग्य शिबिराची पहिल्यांदा असे एकूण 3 वेळा **'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड'** मध्ये नोंद.

## कार्य आरोग्य सेवेचे, यशस्वी जन सेवेचे!

### महिला व बालक

१) **'माता सुरक्षित तर घर सुरक्षित'** अभियानांतर्गत एकूण **४,३९,२४,१००** माता-भगिनींची आरोग्य तपासणी. त्यात **२७,९७,३९४** गरोदर मातांचा समावेश.

२) **'जागरुक पालक, सुदृढ बालक'** अभियानांतर्गत ० ते १८ वर्षे वयोगटातील **२,४९,५४,२५७** बालकांची सर्वांगीण आरोग्य तपासणी आणि संदर्भ सेवा.

३) **मेळघाट** सारख्या दुर्गम भागासाठी **४३ कलमी** कार्यक्रमाची अंमलबजावणी.

४) गर्भधारणापूर्व माता व दोन वर्षापर्यंतच्या बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी **'वात्सल्य'** विशेष योजना.

५) माता मृत्यू व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या उद्देशाने राज्यातील आदिवासी व दुर्गम भागात **माहेरघर योजनेला मुदतवाढ.**

६) राज्यातील **स्त्री भ्रूण हत्या** रोखण्यासाठी पीसीपीएनडीटी अंमलबजावणी तक्रार नोंदविण्यासाठी **http://amchimulgimaha.in** हे संकेतस्थळ सुरु व **१०४ टोल फ्री हेल्पलाईन.**

७) बाल मृत्यूदर कमी करण्यासाठी आखण्यात आलेल्या विशेष उपाययोजनांना लक्षणीय यश. राज्याचा बाल मृत्यूदर केवळ **१८ प्रती १००० जन्म/बालमृत्यू शून्यावर** आणण्याकरिता विशेष प्रयत्न सुरू.

### मानसिक आरोग्य

८) जालना, भिवंडी, पुणे आणि नागपूर येथे मानसिक आरोग्य व नवीन **व्यसनमुक्ती केंद्रे.**

९) ठाणे व कोल्हापूर (उदगाव) येथे **अत्याधुनिक प्रादेशिक मनोरुग्णालय.**

### कर्करोग आणि उपचार

१०) राज्यामध्ये ४ ठिकाणी **नवीन रेडिओथेरपी** युनिटची स्थापना.

११) कर्करोगावरील उपचारासाठी **३४** जिल्ह्यांमध्ये **केमोथेरपी डे-केअर सेंटर.**

१२) **८ मोबाईल कर्करोग निदानाची** सुविधा उपलब्ध.

### आस्थापना/रिक्त पदांची भरती

१३) राज्यातील **वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ऑनलाईन पोर्टलद्वारे बदल्या.** अधिक पारदर्शकता आणि अचूकतेसाठी निर्णय.

१४) आरोग्य सेवेत गट 'क' व 'ड' संवर्गातील **रिक्त १०,९४९ पदांची पारदर्शक भरती.**

१५) **वैद्यकीय अधिकाऱ्यांची** युद्धपातळीवर भरती. **१,४४६** अर्हताधारक उमेदवारांना पदस्थापनेचे **ऑनलाईन आदेश.**

* **२८३ बीएएमएस वैद्यकीय अधिकाऱ्यांना ऑनलाईन नियुक्तीचे आदेश.**
* **राज्यातील वैद्यकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे व्यवसायरोध भत्ता देण्यास मंजुरी.**

### आरोग्य सुविधा

१६) **हृदयरोग रुग्णांसाठी** राज्यात **१६** ठिकाणी कार्डियाक कॅथलॅब, **२२** ठिकाणी एमआरआय, **४९५** ठिकाणी डायलिसीस सुविधा.

१७) धाराशिव येथे **'फिरते मल्टीस्पेशालिटी रुग्णालय'** सुरू.

१८) आधुनिक उपकरणासहित व तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकासह **१,७५६ ॲम्बुलन्स** खरेदीचा निर्णय.

१९) राज्यातील रुग्णांना किडनी स्टोन आजारावर अत्याधुनिक उपचारासाठी **लिथोट्रीप्सी** उपचार सेवा.

२०) रुग्ण मृत्यू पावल्यास मृतदेह रुग्णालयातून नेण्यासाठी **प्रत्येक तालुक्यात एक शववाहिका.**

२१) **२३४** तालुक्यांतील ग्रामीण रुग्णालयात **डायलिसीस सेवा.**

२२) प्रत्येक जिल्ह्यात **हिमोफिलिया डे-केअर** सेंटर उपलब्ध.

२३) राष्ट्रीय **सिकलसेल** मिशन अंतर्गत **३० लाखांपेक्षा जास्त** नागरिकांची सिकलसेल तपासणी.

२४) साथरोगाच्या उद्रेक, रुग्ण संख्या व मृत्यूमध्ये **लक्षणीय घट.**

### तरुण आणि ज्येष्ठ नागरिक

२५) **'निरोगी आरोग्य तरुणाईचे, वैभव महाराष्ट्राचे'** अभियानांतर्गत १८ वर्षांवरील सुमारे **३ कोटीपेक्षा** अधिक पुरुषांची तपासणी.

२६) **मोतिबिंदूमुक्त** महाराष्ट्र अभियानांतर्गत **१ लाखांपेक्षा** अधिक शस्त्रक्रिया.

### पायाभूत सुविधा

२७) पंढरपूर येथे राज्यातील पहिले **१,००० खाटांचे** वारकऱ्यांच्या आरोग्य सेवेसाठी कायमस्वरूपी सुसज्ज रुग्णालय.

२८) **महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाची स्थापना.**

२९) पुणे, अहमदनगर, नंदुरबार, सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांमध्ये **३० खाटांची आयुष रुग्णालये.**

३०) राज्यात आतापर्यंत **३४७ 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना'** कार्यान्वित. ७०० 'आपला दवाखाना'ची अंमलबजावणी सुरु.

३१) **'सुंदर माझा दवाखाना'** अभियानांतर्गत आरोग्य संस्थांची स्वच्छता आणि सुशोभीकरण.

३२) **राज्यातील १५ आरोग्य पायाभूत सुविधा प्रकल्पांचे** मा. पंतप्रधानांच्या हस्ते भूमिपूजन आणि लोकार्पण.

### महाआरोग्य शिबीर

३३) **'आरोग्याची वारी पंढरीच्या दारी'** उपक्रमांतर्गत
वर्ष २०२३ - **११ लाखांपेक्षा** अधिक
वर्ष २०२४ - **१५ लाखांपेक्षा** अधिक
**२ वर्षात २६ लाखांपेक्षा अधिक वारकऱ्यांची मोफत आरोग्य तपासणी** आणि संदर्भ सेवा.

३४) पंढरपूरच्या महाआरोग्य शिबिराची **'इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड'**मध्ये नोंद.

३५) ग्रामीण भागातील जनतेला गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा देण्यासाठी परंडा येथे **महाआरोग्य शिबीर.**

### मोफत उपचार व आरोग्य संरक्षण

३६) **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचे** आरोग्य संरक्षण **रु. १.५० लाखांवरून ५ लाख रुपयांपर्यंत वाढवले.** योजना राज्यातील सर्व रहिवाशांना लागू. **(रेशन कार्ड अट रद्द)**

३७) राज्यात सुमारे **५ कोटी** पेक्षा जास्त जनतेची आयुष्मान भारत डिजिटल अकाउंट नोंदणी.

३८) सर्व नागरिकांना १५ ऑगस्ट २०२३ पासून **मोफत वैद्यकीय उपचार.** गेल्या वर्षभरात बाह्यरुग्ण लाभार्थी संख्येत दुपटीने वाढ.

### आशा व गटप्रवर्तक/कर्मचारी

३९) आशा स्वयंसेविका आणि गटप्रवर्तकांना कर्तव्य बजावताना अपघाती मृत्यू झाल्यास **रु. १० लाख** व कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास **रु. ५ लाख** सानुग्रह अनुदान.

४०) **आशा स्वयंसेविकांच्या मोबदल्यामध्ये भरघोस वाढ.** मासिक मानधनामध्ये **रु. ५,०००** वाढ. आता **रु.१३,०००** प्रती महिना.

४१) **आशा गटप्रवर्तकांच्या मोबदल्यामध्ये रु. ४,००० भरघोस वाढ.** आता प्रती महिना **रु. १९,९७५.**

४२) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्यातील कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांपैकी १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या **कंत्राटी कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवेतील मंजूर समकक्ष पदांवर सामावून घेण्यास मंत्रिमंडळाची मान्यता.**

डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/डी ४२२४



देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

अजित पवार
उपमुख्यमंत्री

प्रा. डॉ. तानाजी सावंत
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

**मोफत आरोग्य सल्ला मिळविण्यासाठी डायल करा**
**टोल फ्री क्रमांक १०४**